# पुण्यांत ट्रॅम

## नि इतर विनोदी निबंध

गोविंद भिकाजी रानडे

१८५०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८५२

REFBK-0007387

गिरगांव, मुंबई

* ६९ *

मूल्य सव्वा रुपया


पुण्यांत ट्रॅम
केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगाव, मुंबई
गो. वि. रीतडे

# पुण्यांत ट्रॅम

## नि इतर विनोदी निबंध

गोविंद भिकाजी रानडे

REFBK-0007387

ग्रं. क्र. ४३८८

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

*. :६१ *

मूल्य सव्वा रुपया

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : १९५०

मुद्रक : बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : केशव भिकाजी ढवळे,
श्री समर्थ-सदन,
गिरगांव, मुंबई ४

11034

माझे स्नेही 'धनुर्धारी' चे संपादक

श्री. अ. सी. केळूसकर

ह्यांना मी हा संग्रह अर्पण करीत आहें

# मनोगत

१९४७ सालीं 'व्यक्ति आणि अपेक्षा' हा माझा पहिला लेखसंग्रह प्रसिद्ध झाला. आणि आज १९४९ सालीं म्हणजे दोन वर्षांनीं 'पुण्यांत ट्रॅम' हा माझा दुसरा लेखसंग्रह प्रसिद्ध होत आहे. हें आत्मनिवेदन वाचून कांहीं वाचक गमतीनें मनांतल्या मनांत म्हणतीलही, कीं 'दोन वर्षांचा पाळणा दिसतोय!'

प्रस्तुत संग्रहांत समाविष्ट केलेले लेख उषा, झंकार, धनुर्धारी, नवयुग, मौज आणि हिंद (साप्ताहिकें व मासिकें यांचीं नांवें अकारानुक्रमें दिलीं आहेत), इत्यादि साप्ताहिकांतून व मासिकांतून यापूर्वीच प्रसिद्ध झालेले आहेत.

श्री. हरि विनायक वाडेकर, श्री. विष्णु गणेश भिडे व श्री. रघुनाथ गंगाधर विद्वांस या मित्रत्रयीनें मला वेळोवेळीं लेखनास उत्तेजन दिल्याबद्दल आभार न मानून कसें चालेल?

शेवटीं एकच सांगायचें राहिलें. श्रीसमर्थांच्या ओवींत थोडासा बदल करून मी म्हणतों —

ऐसे पूर्वीं थोर थोर । झाले साहित्यिक अपार ॥
आतां आहेति पुढें होणार । नमन माझें त्यांसि पैं ॥

गोविंद भिकाजी रानडे

२३।२० सदाशिव पेठ,
देशमुखवाडी, पुणें २.

सं. नि.
१५२


| | | |
|---|---|---|
| १ | पुण्यांत ट्राम ? | १ |
| २ | रोजनिशी लिहा — ! | ८ |
| ३ | बायको माहेरीं जाते तेव्हां — ! | १४ |
| ४ | वठलेला वृक्ष — ! | १८ |
| ५ | चोराची बायको ! | २१ |
| ६ | अंधकवि — ! | २७ |
| ७ | आमची स्वर्गावर स्वारी ! | २९ |
| ८ | अरेरे ! पुण्यांत राम नाहीं ! | ३४ |
| ९ | जागा भाड्यानें देणें आहेत ! | ३९ |
| १० | अरेरे ! अगदीं फुकट गेला ! | ४३ |
| ११ | डिटेक्टिव्ह रावसाहेब एकबोटे ! | ४८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6316

१

# पुण्यांत ट्राम ?

" अय्या ! पुण्यांत नि ट्राम ? झालंच मग. "

मीं दचकून मागें पाहिलें ! आमच्या सौभाग्यवती खुर्चीच्या पाठीमागील बाजूवर रेलून मी लिहीत असलेल्या लेखाच्या मथळ्याकडे पाहून हसत होत्या...

मीं फाउन्टन टेबलावर ठेवून माझ्या उजव्या हातांत तिच्या डाव्या हाताचें मधलें बोट घेऊन तिच्याकडे पहात म्हटलें—

" मग—काय शक्य नाहीं आहे हें ? "

" हो-हो ! आहे ना शक्य. उद्यां आगगाडीसुद्धां रस्त्यांतून जाणें शक्य आहे. " माझ्या हातांतून बोट सोडवत तिनें म्हटलें.

इतक्यांत ' मादी टरॅम-मादी टरॅम ' म्हणत आमचे चिरंजीव-उमर वर्षे दोन-धापा टाकत चालत आले !

" बघ ! ह्याची ट्राम जर घरांत वावरते तर मग मोठी ट्राम रस्त्यांतून जाणें कां नाहीं शक्य ? " मीं विजयी मुद्रेनें सौ. कडे पाहात विचारणा केली.

" जा बाई-मला नाहीं वेळ तुमच्याशीं वाद घालायला-मला हळदीकुंकवाला जायचंय् डेक्कन जिमखान्यावर त्या साठ्यांकडे. "

" मग जा कीं ! माझी कुठें ना आहे. हो पण, राणीसाहेबांना एक घोड्याच्या टांग्यांतून जायचं असेल...चार दुणे आठ आणे भुर्दंड आला. ए ! बघ इकडे ! आतां जर का ट्राम असती तर दोन आण्यांत नसतं कां भागलं ? "

" पण म्हटलं ट्राम सुरू व्हायला पाहिजे ना ! "

" तेंच म्हणतों मी-पुण्यांत ट्राम सुरू करायची झाल्यास काय काय अडचणी उपस्थित होतील ह्या विषयावर आपण आज रात्रीं अंथरुणावर पडल्या पडल्या बोलूं पाहिजे तर. "

" एवढंच म्हणालांत म्हणून बरं आहे बाई ! नाहीं तर म्हणालां असतात कीं, ' सनातनी संस्कृतीचीं स्थित्यंतरें ' ह्या विषयावर रात्रीं बोलूं म्हणून...बरं जातें हं मी...अरुणला संभाळा म्हटलं...! "

● ● ●

पुण्यांत ट्राम सुरू करायची झाल्यास-मी विचार करीत होतों-किती असंभाव्य गोष्ट आहे ही, नाहीं ? एक वेळ किर्लोस्करी पंपानें पृथ्वीवरील पुण्यवान् पामरांची परलोकांत रवानगी करण्यांत येईल, हिंदुस्थानांत पन्नास पन्नास मजल्याच्या इमारती उठवण्यांत येऊन आजकालच्या झपूर्झा कवींना काव्य झाल्यास त्यांना ते पन्नास मजले चढण्या-उतरण्याची शिक्षा दिली जाईल, कॉलेज-वसतिगृहांत मुलेंमुली एकत्र राहण्याची व्यवस्था करण्यांत येऊन सनातन्यांच्या नाकांवर मिरीं वाटल्याचा आनंद नवमतवादी उपभोगतील, नगरभवानींच्या जमावांत एक कुलीन स्त्री राहाते असें एखादा अश्लील संशोधक कोकलत आल्यास त्यावर विश्वास ठेवणें योग्य होईल, पण पुण्यांत ट्राम सुरू करणार आहेत अशी, आजच्या भांडखोर प्रजेला जन्म देणाऱ्या ब्रह्मदेवानें जरी भाईच्या तावातावांत घोषणा केली तरी कोणी त्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीं !

पण समजा, सध्याच्या कॉंग्रेस-मंत्रिमंडळाच्या डोक्यांत [ महात्मा गांधींच्या कृपेनें ! ] ही कल्पना शिरली, आणि समजा, एखाद्या टक्कल पडलेल्या दिवाण-बहादुराच्या साह्यानें जर मंत्रिमंडळानें ट्रामकंपनी काढायला परवानगी दिली [ येथें वशिल्याची गोष्ट येत नाहीं ! ] तर मात्र ही कल्पना. सत्यसृष्टींत उतरविण्याचा प्रयत्न केला जाणें संभवनीय आहे.

पण कुठल्याही गोष्टीस आरंभ करावयाचा म्हणजे पैसा पाहिजे. कंपनी सुरू करण्याचें जरी निश्चित ठरलें, तरी प्रथम भांडवलाची जरूरी लागेल आणि अशा मोठ्या योजनेला भांडवल देणारा एकटादुकटा भांडवलवाला निघणें शक्य नाहीं.

ह्याकरितां भांडवल उभारण्यासाठीं शेअर्स काढावे लागतील... आणि आमचे पुणेकर नि शेअर्स घेणार ?

बृहन्महाराष्ट्रांतच काय पण अखिल हिंदुस्थानांत पुणें हें नांवाजलेलें शहर आहे. आणि पुणेकर हा प्राणी म्युझियमध्यें ठेवण्यालायक विदूषक आहे, असें म्हटल्यास पुणेकरांचा माझ्यावर घुस्सा होण्याचा संभव आहे. पण सध्याचे मंत्री असेंब्लींतील विरोधीपक्षाला जेवढा मान देतात तेवढाच मी त्यांच्या घुश्श्याला देईन हें मी त्यांना सांगण्याची आतांच परवानगी घेतों !

पाताळयंत्री पेन्शनरांच्या पांजरपोळांनीं पक्क, सोवळया सनातन्यांच्या समूहानें सज्ज, विशालपोटी व्यापाऱ्यांच्या व्यापानें वसवसलेलें, अक्कडबाज विद्यार्थ्यांच्या समूहानें भरलेलें, सकच्छविकच्छ नेसल्यानें शोभा आणणाऱ्या केतकीकांतेच्या कमलिनीनें फुललेलें हें पुणें शहर, त्यांत ट्राम सुरू करणें किती अवघड नि धोक्याचें आहे हें जावें त्याच्या वंशा तेव्हां कळे ! शेअर्स काढल्यानंतर हे पुणेकर ते शेअर्स खरेदी करून भांडवल उभारण्यास मदत करतील ही आशा करणें म्हणजे गगनाला गवसणी घालण्याचा प्रयत्न करण्यासारखें खुळचट आहे ! 'किती रुपयांचा शेअर आहे ? डिव्हिडंड काय ? सिक्युरिटी कसली ? कंपनी बुडाली तर ?' ह्या नानाविध चौकश्या करून एखाद्या लोकोपयोगी योजनेला खो घालणें हा श्राद्धपक्षाच्या जेवणास चटावलेल्या आमच्या पुणेकरांचा बाणा आहे !

पण समजा, ज्याप्रमाणें मुलीचा मुलगा होतो, एखाद्या बाईला चारचार मुलें होतात, रक्ताचा पाऊस पडतो, त्याप्रमाणें दैवयोगानें कांहीं विपरीत [ ! ] गोष्ट घडून आली आणि भांडवल उभारलें गेलें तरी ट्रामवे सुरू करण्याच्या मार्गांत किती अडचणी उपस्थित होतील हें पुढें केलेल्या ऊहापोहावरून वाचकांच्या निदर्शनास येईल.

पुण्याच्या अरुंद नि गलिच्छ रस्त्यांतून ट्रामचा मार्ग आंखणें कांहीं शक्य नाहीं. तेव्हां जर ट्राम सुरू करावयाची असेल तर त्या कंपनीला प्रथम पुण्याचे रस्ते रुंद करण्याचें अवघड काम हातीं घ्यावें लागेल. [ त्यांत त्यांना कितपत यश येईल हें पुणें शहर करणाऱ्यालाच ठाऊक ! ] पुण्याचे रस्ते म्हणजे सोडावॉटरच्या बाटलीसारखे ! पुण्यास आजपावेतों एकही रस्ता असा निर्माण झाला नाहीं, कीं तो कांटेकोरपणें मोजल्यास सरळ भरेल. रस्त्यारस्त्यांत तरी किती तफावत ! आमचे पुण्याचे रस्ते कोठल्याच गांवच्या रस्त्यांना हार जाणार नाहींत ! आणि रस्त्यांवर खड्डे

तरी किती ! डांबरी रस्ते झाले तरी त्यांवर चिखल हा झालाच पाहिजे, असा म्युनिसिपालिटीनें डांबरी रस्ते करतांना नियम घालून दिला होता कीं काय, हें म्युनिसिपालिटीचें पेशवाई दप्तर पाहूं गेल्यासच कळेल ! बाहेरगांवचा पाहुणा पुण्यांत आला आणि जर कां त्या पठ्ठयानें सायकलवरून पुण्याची टेहेळणी करण्याचें ठरवलें तर ' हार्निया 'चा भयंकर रोग घेऊन तो पुण्यांतून बाहेर पडेल, असें माझेजवळ एक एल. सी. पी. एस. झालेला कंपाऊंडर नेहमीं बोलून दाखवितो.

रस्ते सरळ करण्याच्या मार्गांत तरी किती अडचणी आहेत. कुठें हिंदूंचें एखाद्या बटाटया किंवा पत्र्या मारुतीचें मंदीरच उपटतें, तर एखादा सोटया-म्हसोबा खव्या पारशासारखा चटकन् प्रगट होतो ! दत्त तर काय बी. ए. सारखे त्रिस्थळीं सांपड-तील, आणि गणराज आपल्या तुंदिलतनूचें प्रदर्शन करण्यासाठीं रस्त्याच्या मध्यभागीं ' ठिया ' देऊन बसलेले जागोजाग आढळतील—आणि विठोबा आपल्या आवडत्या रखुमाईसह भक्तांना दर्शन देण्यासाठीं ' मी उभा आहें ' असा खडा जबाब देतील ! अशा तऱ्हेनें जागोजागीं हीं देवांचीं मंदिरें विखुरलीं गेलीं असल्यामुळें त्या मंदिरांना धक्का न लावतां [ नाहींतर सनातनी × × लत उठतील ! ] त्यांना वळसा घालून रस्ते आंखण्याचें काम म्युनिसिपालिटीला करावें लागतें. आणि सोम्यागोम्याच्या [ किंवा खां-अल्लींच्या ] मशिदी तर हटकून सांपडायच्या मंदिरापाशीं ! मला वाटतं हीं मंदिरें आणि मशिदी जेव्हां बांधल्या गेल्या तेव्हां हिंदुमुसलमानांत एकी असली पाहिजे. [ वाचकांना जास्त कुतूहल उत्पन्न झाल्यास इतिहाससंशोधनाचा उपद्व्याप करणारां-कडे त्यांनीं चौकशी करावी ! ] अर्थात् ही त्या त्या जातींचीं पूज्यस्थानें—त्यांच्या धार्मिक भावना दुखवल्या जाऊन भलताच प्रसंग ओढवेल ह्या भीतीनें तीं पाडतां येत नाहींत.

बरं ! मंदिर अगर मशीद आडवी आली नाहीं तर म्युनिसिपल मेंबरांचें [ मेंढरांचें नाहीं हं ! ] स्वतःचें घर मध्येंच उपटतें. हा प्राणी आपला वशिला लावून आपलें घर न पाडतां रस्ता रुंद करावा असा चीफ ऑफिसरकडून हुकूम मिळवितो ! मग कशी होणार शहरसुधारणा ! त्या म्युनिसिपालिटीला असणार पन्नासच्यावर नवरे ! [ दसपट द्रौपदी ! ] प्रत्येकाचा लागतोच आहे वशिला चीफ ऑफिसरकडे ! त्या बिचाऱ्याची मात्र मधल्यामधें गळचेपी होते. प्रत्येक मेंबराची वकूब संभाळतां संभाळतां हा मात्र बेवकूफ ठरतो ! !

रस्ते रुंद करण्यासाठीं आजूबाजूचीं घरें पाडावीं लागतात. आणि बाजूच्या घर-मालकांना त्यांचं घर पाडण्याबद्दल कॉंपेन्सेशन द्यावें लागतें. ते पैसे द्यायला म्युनिसिपालिटीजवळ पैसा शिल्लक आहे कुठें ? एवढी होणारी जमा कोठें जाते हें एक देवाला–नव्हे मेंबरांना—ठाऊक ! पण मेंबर्स कसले खप्पी ! मतें मागायच्या वेळेस गरीब शेळीप्रमाणें हटकून हजर ! आणि निवडून आल्यावर एखाद्या रानडुकराप्रमाणें इकडे तिकडे न बघतां बेडरपणें सरळ निघून जातात !

इ. स. २००० सालीं तरी पुण्याचे रस्ते रुंद होतील कीं नाहीं ह्याची बळकट शंका आहे. ट्राम सुरू करावयाची तर सर्वत्र डांबरी रस्त्याची जरूरी भासेल. पण ते करण्यांत तरी किती किळसवाणी वशिलेबाजी पाहा ! प्रथम मेंबरांच्या घराभोंवतालचे रस्ते डांबरी होतात. आणि नंतर गांवांतील इतर रस्ते ! पण डांबरी सडका तरी नीट केल्यात का ? पुण्यांतील बहुतेक रस्त्यांवर [ गळवें आल्यावर जशा गम्पलास पट्ट्या लावतात तशा ! ] ठिगळें मारलेलीं आढळतील. कारण डांबरी सडका झाल्यानंतर मग यांना ड्रेनेज काढलें नसल्याची आठवण व्हायची ! मग पुन्हां रस्ता खणून ड्रेनेज बांधायचें...वाहवारे इंजिनिअर्स ! आणि डांबरी रस्ते तरी असे झालेत कीं, पुन्हां कांहीं वर्षांनीं ते दुरुस्त करण्याची पाळी येईल ! एकदां पुण्यांत एका रात्रीं चार इंच पाऊस पडला, तर त्या पावसानें कित्येक गल्ल्याकुच्यांतील डांबरी रस्ते साफ उखणले जाऊन जणूं काय रस्त्यावर नुकतीच खडी शिंपडलीय् अशी त्या रस्त्यांना शोभा आली ! योग्य त्या इसमास न निवडतां अक्षरशत्रु असामींना मतें देऊन मतदार आपल्या नालायकीचें प्रायश्चित्त सतत तीन वर्षें भोगत असतात !

पुण्यांत रस्त्याच्या मध्यावर येऊन पतंग उडवायची बऱ्याच उडाणटप्पूंना संवय लागून राहिली आहे. लंगोटींतल्या लहान मुलापासून तों अच्छेर मिशांचा भार वरच्या ओठावर पेलणाऱ्या थेरड्यांपर्यंत सर्वजण पतंग उडवतात. ट्राम सुरू झाल्यावर शहरभर तारांचें जाळें निर्माण होईल व रहदारीही जोरांत सुरू होण्याचा संभव आहे. बरं, हे लोक आपला पतंग उडवण्याचा पिढ्यान् पिढ्याचा हक्क सोडणार नाहींत— आणि अशा तऱ्हेनें अपघाताच्या संख्येंत भर मात्र पडेल !

अशा तऱ्हेच्या भयंकर अडचणींच्या धोंड्यांना बाजूला उडवून ट्राम सुरु करण्याचा मार्ग खुला करणें मानवी सामर्थ्याच्या आटोक्याबाहेर आहे. पण ज्याप्रमाणें प्लेग व आग ह्या आपत्ति कोसळल्यामुळें हल्लींचें नवीन लंडन शहर निर्माण झालें

आहे तशी एखादी आपत्ति [ वाईट वाटतें हें लिहायला ! ] दैवयोगानें पुण्यावर कोसळली तरच नवीन पुणें निर्माण होण्याची आशा आहे आणि मगच ट्राम सुरू करणें शक्य होईल—

आणि ह्या योग जुळून आला आणि जर का पुण्यांत ट्राम सुरू झाली, तर प्रथम प्रथम बघ्ये लोकांना बऱ्याच मौजा पाहायला मिळतील. पुण्यांत ट्राम सुरू झाल्याबरोबर आमच्या पोटावर पाय आणला अशी नेहमींचीं तक्रार टांगेवाले करतील. भाई लोक त्यांच्या तक्रारीचा मसुदा तयार करून दिवाणांना भेटतील, आणि दिवाण नेहमींप्रमाणें त्यांना वाटाण्याच्या अक्षता लावतील ! ट्राम सुरू झाल्याबरोबर टांगेवाल्यांचा धंदा बराच बसेल आणि पुणेरी टांगेवाला म्हणून कोटीही मारायला नको असें होऊन जाईल ! गालीचा–गणपती वगैरे सार्वजनिक प्रसंगीं स्त्रियांना धक्के मारणारा जो एक विशिष्ट वर्ग आहे त्या लोकांचें मात्र ह्या योजनेंत फावेल. आणि मग त्या स्त्रिया विनयभंगाची फिर्याद गुदरतील. ते खटले कॅमेऱ्यांत चालवतील–आणि सार्वजनिक बेअब्रू होऊं नये म्हणून त्या स्त्रिया पुनः आपले खटले काढून घेतील ! हुजूरपागा–कन्याशाळा–सेवासदन वगैरे मुलींच्या शाळेपाशीं ट्राम स्टेशनें उभारलीं जातील–आणि पुण्याचें ‘ पिकेटिंग ’ एवढें वाढेल कीं, त्या शाळांतून बाहेर पडणाऱ्या कमलिनींकरितां हे भृंगांचे कळप भूं भूं करीत कित्येक तास उन्हांत तिष्ठत बसतील ! कित्येक फुकटचे लोक ट्राममधून फुकट प्रवास करण्याचा प्रयत्न करतील–आणि तो न साधल्यामुळें ट्राम कंडक्टर त्यांना गचांडी देऊन बाहेर हाकलतील !

पण भोजनभाऊ भटजींना त्यांत कसें बसतां येणार ? श्राद्धाला चाललेला भटजी, त्याला उशीर झाला तर थोडाच ट्राममधून जाणार आहे ?

आणि ही योजना पूर्णपणें अस्तित्वांत आली तरी पुणेकर आपला सायकलवर बसण्याचा हक्क थोडाच सोडणार आहेत ! आणि पुण्यांत सायकलस्वारांचीच संख्या फार असल्यामुळें ट्रामनें कोणीही प्रवास करणार नाहीं !

एकंदरींत कितीही अडचणी सोसून ट्राम सुरू झाली तरी ती योजना फलद्रूप होणें शक्य नाहीं.

● ● ●

" निजावं आतां गडे! करायचंय् काय आपल्याला त्या ट्रामशीं ! नाहीं सुरू झाली तर नाहीं! त्यावांचून थोडंच अडून राहिलंय् ! " आमची सौ.वती काकुळतेनें म्हणाली. कारण दोन वाजेपर्यंत वरील वादविवाद करीत आम्ही आंथरुणावर पडलों होतों ! दुसऱ्या दिवशीं दिवाळी असल्यामुळें पुन्हा चारलाच स्नानासाठीं उठायचें होतें—

मीं कडेला वळून पाहिलें—तों सौ.वती घोरूंही लागली होती !

★ ★ ★

२

# रोजनिशी लिहा—!

" आज मला खरा आनंद झाला. माझ्याशीं पटत नाहीं म्हणून चार दिवसांपूर्वी घराबाहेर पडलेला माझा मुलगा माझी ' केसरी 'मधील आत्यंतिक प्रेमाची जाहिरात वाचून घरीं परत आला. शेतकऱ्याच्या शिरावरील कर्जाच्या बोजांतून त्याला मुक्त करण्याकरितां एखाद्या कसायानें त्याजकडून त्याची सवत्स धेनू हिरावून न्यावी—आणि ती आकस्मिक परत आल्यावर त्याला जसा आनंद होईल—अगदीं तसाच आनंद मला झाला ! म्हाताऱ्या माणसाचे बुरसलेले पुराणमतवादी विचार नवमतवादी तरुणांना पटणार नाहींत हें माहीत आहे मला, पण त्यांचा समन्वय करण्याची संधि तरी द्या आम्हांला ! माझ्याशीं पटत नाहीं म्हणून घर सोडून जाणाऱ्या माझ्या मुलाला, ' तुझ्या विचारांप्रमाणें तूं वाग ! माझ्या विचारांचं तुझ्याशीं पटलं तर मी तुझ्यासारखा वागेन ' असं जर मीं समजावून सांगितलं तर पटेल त्याला—असा मला भरंवसा आहे. हल्लींचे तरुण अगदींच कांहीं नेभळे नसतात. त्यांचे विचार पूर्वीच्या तरुण पिढीच्या विचारांपेक्षां खास स्फुरलेले असतात/ त्यांची स्वातंत्र्योत्सुक वृत्ति गौरवास्पद असते हें निश्चित ! "

● ● ●

" पावसाळ्यांत खंडाळ्याच्या घाटांतील सृष्टिमनोहर देखावा एकदां डोळे भरून पाहावा असा कित्येक दिवसांचा माझा संकल्प होता. अखेरीस आज गेलोंच खंडाळ्याच्या घाटावर ! तेथील सृष्टिशोभा पाहात असतां माडखोलकरांच्या नव्या कादंबरींतील

अगदीं हुबेहूब वर्णन आठवलं मला! 'आभाळांतून कोसळून जमिनीवर सैरावैरा धावणारें हें पाणी बघून–आईच्या कडेवरून खालीं झेंप टाकून दुडदुडु धावणाऱ्या मुला-सारखं वाटतं हें पाणी!' अशा तऱ्हेचा एखादा ढग जवळ आल्यावर लहान मूल जसें फुगा धरण्याकरितां आपले चिमुकले नाजूक हात वर करतें–तसें आपणही तो ढग पकडण्याकरितां चवडे उंच करून झेप टाकावी असें वाटलें मला! ह्या कल्पनारूपी डोहांत मी तरंगत असतां माझ्यामागें कसलासा आवाज झाला! सोळा सतरा वर्षांची एक तरुणी उभी होती! सैलसा अंबाडा व त्यावर गुलाबाचें फूल! थोडासा गार चारा असल्यामुळें इतर केंसांशीं लपंडाव खेळणारी ती डाव्या बाजूची बट! आकाशांत लुकलुकणाऱ्या चांदणीप्रमाणें दिसणारी ती कपोलावरील टिकली! मादक उरोभागा-वरील स्पष्ट दिसणारी ती मोहनमाळ!–आणि पातळ चापचोपून नेसल्यामुळें दृष्टो-त्पत्तीस पडणारा प्रत्येक सुंदर न् प्रमाणबद्ध अवयव–! तिच्या स्वर्गीय सौंदर्यावर मी आषक्त झालों...!"

● ● ●

"प्रॅक्टिकल करीत असतांना डॉ. सुशील सारखं माझ्याकडेंच पाहात असतात! माझ्याबद्दल खरंच का असेल त्यांच्या मनांत प्रेम? कोणास ठाऊक बाई! आज चार दिवस पाहातें आहें, प्रॅक्टिकल संपवून घरीं आल्यावर कांहीं करायला जावं–तर कश्श्यांत सुद्धां बाई मन रमत नाहीं. सारखे डॉ. सुशील डोळ्यांसमोर उभे राहातात. त्या दिवशीं खालीं वांकून प्रॅक्टिकल समजावून सांगत असतांना चुकून माझ्या हाताला त्यांचे केंस लागले! किती मऊ होते केंस! अगदीं रेशमासारखे! डॉ. सुशील एकदां विचारून कां टाकत नाहींत मला ह्याबद्दल? का मीच विचारूं त्यांना?...कीं...पण मी बरं विचारीन?..."

● ● ●

उपरिनिर्दिष्ट उताऱ्यांपैकीं पहिला मीं माझ्या वडिलांच्या एका स्नेह्यांकडे गेलों असतांना त्यांच्या टेबलावर पडलेल्या रोजनिशींतून गंभीरपणें वाचला. दुसरा माझ्या एका कविमित्राच्या डायरींतील आहे! तिसऱ्याचा मात्र इतिहास वर्णन करायला एक स्वतंत्र लघुकथाच लिहावी लागेल! दुसऱ्याची रोजनिशी चोरून वाचूं नये हा शिष्ट-संप्रदाय आहे आणि मीं एका नव्हे तर तीन रोजनिशींतले उतारे वाचले. होऊं नये

ती गोष्ट तर झाली ! आतां त्याला इलाज काय ? एखादा मनुष्य जेव्हां कायद्यांत सांगितलेला गुन्हा करतो तेव्हां त्या गुन्ह्याबद्दल त्याला न्यायालयाकडून योग्य तें शासन होतें. पण माझ्या हातून जो अपराध घडला आहे–त्याला ह्या जगांतील न्यायालयांत तर शासन नाहीं. पण अपराधी जेव्हां आपल्या अपराधाची स्वतःच कबुली देतो, तेव्हां त्यानेंच त्या अपराधास योग्य असें प्रायश्चित्त घ्यावें असा पुराणांत रिवाज असे. आतां ह्यावर तुम्ही पृच्छा कराल कीं, कायहो, तुम्ही सनातनी आहांत वाटतं ? पण मी ह्यावर तुमच्या चौकसबुद्धीचें निरसन कसें करतों पाहा ! ‘ Old is Gold ’ जुनें तें सोनें–हा सिद्धांत जर मी प्रतिपादूं लागलों तर ‘ All that glitters is not gold ’ चकाकणाऱ्या सर्वच गोष्टी म्हणजे कांहीं सोनें नव्हे, हा उपसिद्धांत विरोधी पक्षाकडून मांडला जाईल. मला तेंच पाहिजे आहे. सर्वच जुन्या गोष्टी कांहीं चांगल्या नसतात हें मान्य ! पण त्याबरोबरच कांहीं जुन्या गोष्टी चांगल्या असतात–त्या आचरण्यांत कांहीं वाईट नाहीं–हेंही मान्य करावें लागेल आणि म्हणून मीं चोरून रोजनिशी वाचल्याबद्दल प्रायश्चित घ्यायचें ठरविलें. म्हणजे मीं स्वतः रोजनिशी लिहिण्याचा उपक्रम सुरू केला.

गुप्तपोलिसांप्रमाणें खिडकींतून प्रवेश करणाऱ्या सूर्याच्या सोनेरी किरणांनीं जागें केल्यापासून तों रात्रौ निशादेवीच्या बाहुपाशांत बद्ध होईपर्यंत आपल्याकडून कित्येक बऱ्यावाईट गोष्टी आचरणांत येतात. त्या आपण जाणूनबुजून करतों असें नाहीं माझें म्हणणें ! पण त्या गोष्टींचें आपण मर्यादित टांचण करून ठेवलें तर ?— सकाळीं उठल्याबरोबर प्रातर्विधि उरकून चहा घेत घेत आपण ताजें वर्तमानपत्र वाचतों. नंतर स्नान...वगैरे नित्यकार्यक्रमास सुरुवात होते. त्या कार्यक्रमांतच रोजनिशीलेखनाचा समावेश केला तर कांहीं बिघडेल का ? मनाशीं ठरवूनच टाकावें कीं रात्रीं झोपण्या-पूर्वी रोजनिशी लिहायची ! असें एक तत्त्व आहे, कीं मनाशीं केलेला खरोखरीचा निश्चय पार पडतोच. नेपोलियननें एका ठिकाणीं म्हटलेंच आहे ना कीं, ‘There is no word like impossible in my Dictionary–’ अशक्य ह्या शब्दाला माझ्या शब्दकोशांत जागाच नाहीं.

मी नियमित रोजनिशी लिहूं लागलों असें पाहून आमचे चिंतोपंत एके दिवशीं हेटाळणीच्या स्वरानें आणि त्याच उद्देशानें मला म्हणाले—

“ तुम्हांला रोजनिशी लिहून कांहीं फायदा होतो का हो ? ”

" तुम्हांला भरमसाट चित्रपट पाहून कांहीं प्राप्ति होते का हो ? " त्यांच्या प्रश्नाला बगल देऊन उलट मींच त्यांना पृच्छा केली.

" भरपूर करमणूक आणि बौद्धिक चालना ! " चिंतोपंतांनीं आंग्ल कादंबरीकाराचा आव आणून उत्तर दिलें.

" मग मलाही अमोल मनोरंजन आणि मानसिक स्वास्थ्य मिळतं. " तत्त्ववेत्त्याच्या रुबाबांत मीं माझी बाजू मांडली.

त्यावर चिंतोपंतांनीं माझ्या उत्तराचें सोदाहरण स्पष्टीकरण करण्याची मला विनंती केली. मीही विचार करूं लागलों आणि मला आढळून आलें, कीं कितीतरी फायदे आहेत रोजनिशी लिहिण्याचे !

कल्पना करा कीं, तुम्ही आपल्या खोलींत कॉटवर पहुडलां आहांत. बाहेर पावसाची रिपरिप चालू आहे. तुम्हांला असल्या पावसांत बाहेर जाण्याची बिलकूल इच्छा नाहीं आणि एखादें पुस्तक वाचीत पडावें असें वाटलें, तर वाचण्यासारखें तुमच्याजवळ पुस्तक नाहीं. अशा वेळीं आतां काय करावें ह्या फिकिरींत तुम्ही आहांत ! तर मी तुमच्याजवळ येऊन म्हणेन, कीं महाराज ( अगर महाराणी ), आपल्याजवळ रोजनिशी आहे का आपली ? आणि तुम्हीं जर होकारार्थी उत्तर दिलेंत तर मी पुढें म्हणेन, कीं वाचायला करा ना मग सुरुवात. त्यावर तुम्ही माझ्याकडे नाक मुरडून पाहाल. पण माझ्या सूचनेची अवहेलना करण्याचें तुमच्यांत धैर्य नसल्यामुळें तुम्ही निमूटपणें आपली रोजनिशी काढून वाचायला सुरुवात कराल. आणि तुम्ही त्यांत रममाण झालांत, कीं मी तेथून काढता पाय घेईन. स्वतःची रोजनिशी वाचतांना गतकालीन आयुष्यांतील घडामोडींचा चित्रपटच जणूं कांहीं आपल्या डोळ्यांपुढें चालला आहे असें वाटतें ! त्या चित्रपटांतील दुःखाचे प्रसंग आले कीं अंगावर शहारे येतात, व मजेचे प्रसंग आले कीं सर्वांग रोमांचित होतें. आणि दोन तासांचा अवधि कसा गेला हें लक्षांतही येत नाहीं. रोजनिशीवरून गतकालीन आयुष्याचा चित्रपट पाहातां आल्यामुळें पुढील आयुष्यांत मागील चुकांचें परिमार्जन चांगल्या गोष्टी करून करतां येणें शक्य आहे. रोजनिशी लिहिण्यामुळें होणारा हा फायदा काय थोडा झाला ?

भूतकाळांत होऊन गेलेल्या थोर लोकांचीं चरित्रें त्यांच्या रोजनिशीवरूनच ना आपणांस लिहितां नि वाचतां आलीं ? त्या महात्म्यांच्या आठवणी इतरेजनांच्या

रोजनिशींवरूनच ना आपल्याला समजल्या ? त्या पुण्यवान् लोकांना आदर्श समजून जर प्रत्येक व्यक्तीनें राष्ट्र-कल्याणाकरितां आपले देह झिजविले तर स्वराज्य नि सुराज्यही आपण मिळवूं शकूं. त्या आदर्शपूज्य व्यक्तींनीं रोजनिशी ठेवली-कदाचित् त्यांच्या सान्निध्यांतल्या लोकांनीं ठेवली असेल-पण त्यावरूनच ना त्यांच्या कर्तबगारीची खरी ओळख आपणांस झाली ?

शेंकडों रोजनिश्या जर एकत्रित केल्या तर त्यांतून हजारों लघुकथा-कित्येक कादंबऱ्या-आणि नाटकें लिहितां येतील. कारण त्या रोजनिशींत प्रतीत केलेलें जीवन हेंही एक नाटकच आहे. वास्तववाद पाहिजे अशी हुल्लड करणाऱ्यांना त्या रोजनिशीवरून हवा तेवढा वास्तववाद मिळूं शकेल. रोजनिशींमुळें वाङ्मयांत मौलिक भरच नाहीं का पडणार ?

जातां जातां सहज एक गोष्ट आठवली म्हणून सांगतों. मी मुंबईला असतांना आमच्या शेजारच्या बंगल्यांत एका सॉलिसिटरांचें वास्तव्य होतें. त्यांचा चार वर्षांचा मुलगा कसल्याशा रोगानें आजारी होता. त्यांच्या फॅमिली डॉक्टरांचाच काय पण कोठल्याही डॉक्टरचा त्या रोगावर इलाज चालेना. त्या फॅमिली डॉक्टरांना एक वैद्यबुवा माहीत होते. वैद्यबुवांजवळ त्या मुलाच्या रोगावर एक रामबाण औषध आहे हेंही त्या डॉक्टरमजकुरांना ठाऊक होतें ! पण वैद्यबुवांची अशी एक खोडी होती कीं, ते आपलें औषध कसें तयार करीत हें कधीं कोणाला सांगत नसत. तेव्हां वैद्यबुवांचा शोध करण्याचें त्या डॉक्टरांनीं ठरवलें व अखेर वैद्यबुवांचा पत्ता मिळाला. ते वैद्यबुवांच्या घरीं गेले. पण वैद्यबुवा चारच दिवसांपूर्वी वारल्याचें त्यांच्या मुलीकडून कळलें. वैद्यबुवा वारले हें ऐकून डॉक्टरांना वाईट तर वाटलेंच-पण आतां औषध मिळणार नाहीं-आणि सॉलिसिटरांच्या चिरंजीवांचें भेसूर भवितव्य त्यांच्या डोळ्यासमोर उभें राहिलें. जरा वेळानें त्यांनीं वैद्यबुवांच्या मुलीला वैद्यबुवा आपलीं औषधांचीं टिपणें ठेवीत का असें विचारलें. ती मुलगी म्हणाली-' तें कांहीं मला ठाऊक नाहीं. पण ते डायरी मात्र लिहीत.' हें ऐकतांच डॉक्टर मजकुरांना भान न राहून त्यांनीं आनंदानें त्या मुलीचा हात धरून 'कुठेंत कुठेंत त्या डायऱ्या' असें विचारलें. डॉक्टरांना डायऱ्या मिळतांच त्यांनीं तें औषध कसें तयार करतात हें शोधून काढलें. आणि अशा रीतीनें तो मुलगा वांचला. पण अशा रीतीनें तो मुलगा वांचला—हें ऐकल्यानंतर फार मोठा फायदा आहे रोजनिशी लिहिण्याचा असें तुम्ही म्हणाल ना ?

चिंतोपंतांना मी रोजनिशीचे फायदे वर्णन करून सांगत होतों, इतक्यांत माझ्या बोलण्याला खंड पाडून ते म्हणाले—

" पण रोजनिशींत काय लिहावं हें नाहीं सांगितलंत ? "

" चिंतोपंत ! अहो, विजार शिवल्यावर त्याला गुंड्या ठेवायचं शिंपी कसा विसरेल ? अहो, जो रोजनिशीचे फायदे सांगतो त्याला रोजनिशींत काय लिहावं हें नाहीं का सांगतां येणार ? कोणी लिहितात कीं, ' सकाळीं ७ ला उठलों. चहा घेतल्यानंतर सायकलवरून लायब्ररींत गेलों....वगैरे. ' तर कोणी लिहितात— ' सकाळीं बाजारांत जायचं होतं म्हणून लौकर उठलों. रात्रीं ढेकणांनीं सतावून सोडलं '–रोजनिशी अशी नसते लिहायची. "

" मग कशी ? " चिंतोपंतांना राहावलें नाहीं.

आणि मग मीं त्यांना त्या लेखाच्या वर दिलेले रोजनिशींतले उतारे सांगितले.

एखाद्या हुशार वकिलानें खटला जिंकल्यानंतर कोर्टानें त्याच्या चातुर्याची तारीफ करावी–भूमितीचा अवघड सिद्धांत मुलांना शिताफीनें समजावून सांगणाऱ्या शाळेंतील शिक्षकाची जशी मुलांनीं वाहवा करावी–तशी चिंतोपंतांनीं माझ्या पाठीवर थापा मारून माझी आवडती मंगलोरी तपकीर पुढें केली. त्यांतील एक चिमूट घेऊन मीं त्यांना सांगितलं. " सुधारलेल्या राष्ट्रांतील प्रत्येक इसमाचं एक कर्तव्य काय असं जर कोणीं मला विचारलं तर मी एक कर्तव्य म्हणून सांगेन...रोजनिशी लिहा ! "

★ ★ ★

३

# बायको माहेरीं जाते तेव्हां—!

[ ह्या लेख ' बायको माहेरीं असतांना ' असें उन्मादक शीर्षक असलेल्या काव्यांत वर्णन करण्याचा प्रस्तुत लेखकाचा आद्य हेतु होता. पण साहित्यक्षेत्रांत काव्याला ' काडी'चीही किंमत न उरल्यामुळें सरळ गद्यांतच लिहायचें ठरवलें. सदर लेख साठी उलटलेल्या बुड्ढा-बुड्ढींनीं ' बावालोक ' शाळेंत गेले आहेत, अशी नामी संधि साधून दुपारच्या शांत प्रहरीं ' पडल्या पडल्या एकत्र ' किंवा ' एकत्र पडल्या पडल्या ' वाचावा. नव-विवाहित तरुणानें ' पिठासारखं चांदणं ' पडलेल्या रात्रीं बायकोच्या मुखचंद्राकडे मधून मधून दृष्टि टाकीत पावणेदहाचे सुमारास ' ढेकूणदाणींत ' बसून वाचावा. ]

राम–लक्ष्मण–सीता ही त्रयी अयोध्यानगरी सोडून वनवासास जातांना मिस्टर दशरथ आणि मिसेस् कौसल्या ह्यांना जितकें दुःख झालें नसेल !...विक्षिप्तरावांकडचें नियमित येणारें श्राद्धपक्षाचें आमंत्रण भिकंभटांनीं उपटलें ह्याबद्दल शास्त्रीबोवांना जितकें वाईट वाटलें नसेल !...( आतां ते भिकंभटाचेसुद्धा पिंड पाडतील ती गोष्ट निराळी ! ) वाजवीपेक्षां दोन रुपये कमी पेन्शन बसलें ह्याचें पहाटे उठून पेन्शनर मारुतीकडे धापा टाकीत जाणाऱ्या पेन्शनरला जितकें दुःख झालें नसेल !...' डोळे हे जुलमि गडे ' हें गाणें ऐकून डोळ्यांत काजळ घालून ' नखरा ' करणाऱ्या किशोरीला, डोळ्यांत तेल घालून तिच्या हालचालीकडे पाहणाऱ्या शेजारच्या नलिनीच्या डोळ्यांत ती सलूं लागल्यामुळें, जितकें वाईट वाटलें नसेल !...तितकें दुःख बायको माहेरीं गेली असतांना नवऱ्याला होतें, ह्याची कल्पना विवाहितांनाच असणार. ब्रह्मचाऱ्यांनीं

कितीही जरी वैचारिक मंथन केलें तरी त्यांतून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. आळींतला डॉक्टर सोडून आडगल्लींतल्या डॉक्टरकडे जाणाऱ्या गद्धेपंचविशींतल्या तरुणाला 'तिकडे कां गेला होतास' म्हणून विचारूं नये,–एखाद्या कुलीन अन् यौवनमदानें मुसमुसलेल्या नटीला 'तूं अजून अविवाहित कशी' हा प्रश्न विचारूं नये,–'दोन वर्षे तुरुंगांत राहूनसुद्धा तूं लठ्ठ कसा झालास' असें कोठल्याही देशभक्ताला विचारूं नये,–तद्वतच एखाद्याची बायको माहेरीं कां गेली आहे ह्याची विचारपूस करूं नये! माहेरून सणानिमित्त बोलावणें येतांक्षणींच बायको माहेरीं जाते. बिचारी आजारी पडली कीं माहेरीं जाते. नवऱ्याची नोकरी सुटली तर माहेरीं जाते. नवऱ्यानें 'यशवंती' विवाह केला तर आतां त्या 'घोरपडी' बरोबर आपल्याला सवत म्हणून राहतां येणार नाहीं असा विचार करून ती माहेरीं जाते, किंवा बाळंतपणासाठीं माहेरीं जाते. कारण बायकोचें 'बाळंतपण' करतां करतां नवराच बिचारा 'गर्भगळित' व्हायचा!

मॅट्रिक परीक्षेच्या मांडवांत पहिल्याच वर्षी प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्याला त्याचा बाप जसा उपदेश करतो, त्याची थोडीशी 'चाल' बदलून बायको माहेरीं जातांना नवरा तिला उपदेश करतो. आगगाडी–मोटार–वीज यांचे 'शोध' लागल्यापासून 'स्वर्गाचा शोध' काढण्यास जाणें (इति आत्महत्या करणें!) सोपें झालें आहे! घोकंपट्टी करून परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्याला गाइड्स् निघाल्यापासून पास होणें सुलभ झालें आहे! पावडर, क्रीम्स, तेलें ह्यांच्या मदतीनें 'कुब्जा' छाप कुरूप स्त्रीला अप्सरेसारखें सुरेख होणें सोपें झालें आहे! त्याच चालीवर 'झोन' निघाल्यांपासून बायकोला माहेरीं जाणें सोपें झालें आहे.

माझ्या एका मित्राच्या बायकोला मी नि तो स्टेशनवर 'पोंचवायला' गेलों असतांना तो तिला म्हणाला, "माहेरीं जरा जपूनच खात जा बरं का?"

त्यावर त्याची बायको म्हणाली, "कां हो?"

तर तो चटकन् म्हणाला, "नाहीं–म्हटलं परत आल्यावर आमच्या घरचे दरवाजे मोठे करावे लागतील."

त्याची बायको म्हणाली, "इश्श, कांहीं तरीच!"

पुन्हां तो म्हणाला, "आणि आपल्या या कवीनं तुला म्हशीची धार काढतांना पाहिलं, तर 'समसमा संयोग कीं जाहला' या नांवाची कविता करील ना तो!"

एखाद्याची बायको उन्हाळ्यांत पुण्याला माहेरीं जायला निघाली तर त्यानें पुढील ‘ टिप्स ’ बायकोला अवश्य द्याव्यात. “ टिळक टँकवर पोहायला जाऊं नकोस. ( नाहीं तर ती आजारी पडून ‘ कायमचें दुखणें ’ व्हायचें ! ) वसंतव्याख्यानमालेला नट्टापट्टा करून जाऊं नकोस. दुपारीं झोप नाहीं आली तर ‘ केसरी ’ वाचत जा. ‘ देवा गरिबांना तारा । चहापेक्षां रस बरा ॥ ’ अशी पाटी लटकावलेल्या गुऱ्हाळांत शिरूं नकोस. नाहीं तर तूं नीरस होशील ! इ. इ.

एकादी कजाग बायको माहेरीं गेल्यावर नवऱ्याला निवांतपणें झोप तरी घेतां येईल. पण प्रेमळ बायको माहेरीं गेली—घरांत कोणी नाहीं—तर त्याची शोचनीय स्थिति होईल. बायको घरीं असतांना, आणि बायको माहेरीं गेल्यावर, नवऱ्याला काय वाटत असेल ह्याचें हुबेहूब शब्दचित्र पाहायचें झालें तर ?......

“ उठायचं ना आतां ! ” असें म्हणून कपाळावर आलेले केस मागें सारीत कपोलस्पर्श करणाऱ्या लाडकीच्या हातचा ‘ गोड ’ चहा घेणें कुठें, नि धडपडत उठून तळमजल्यावरील बटबटीत डोळ्यांच्या नि गलेलठ्ठ इराण्याच्या राकट हातचा चहा घेणें कुठें ?—“ पाणी काढलंय् आंघोळीला ! ” असें म्हणतांच हातांतील काम आवरून तिनें निऱ्या केलेलें धोतर नि टॉवेल घेऊन बाथरूममध्यें ‘ फरेंच बाथ ’ करणें कुठें, नि स्वतःच बंब पेटवून धूर डोळ्यांत जात असतांना जवळजवळ गारच पाण्याचे चार तांबे अंगावरून घेणें कुठें ? कोमल हातांतील कंकणांच्या नादमधुर आवाजांच्या पार्श्वसंगीतावर सुखानें चार घास खाणें कुठें, नि पांची बोटें बरबटलेल्या हातानें आणि ‘ पाहिजे का ’ असें भसाड्या आवाजांत विचारणाऱ्या वाढप्याकडे पाहात जेवण उरकणें कुठें ?—जेवण झाल्यानंतर पत्नीच्या हातचा गोविंदविडा चघळत प्रसन्न चित्तानें ऑफिसांत जाणें कुठें, अन् खाणावळींतील जेवणानंतर कसें तरी पान खाऊन करपट ढेकरा देत ऑफिसांत जाणें कुठें ?—ऑफिसांतून आल्यावर घरीं कोणी नाहीं म्हणून गळ्यांत गळा घालणाऱ्या मित्राच्या घरीं जाऊन त्याच्या अर्धा डझन पोरांच्या कैंकाटण्याच्या पार्श्वसंगीतावर ( ! ) त्याच्याशीं गप्पा मारणें कुठें, नि रात्रीं दहाचे सुमारास “ इश्श, किती वेळ वाचत बसायचं तें ? ” असें तांब्या घेऊन खोलींत प्रवेश करणाऱ्या ‘ती’च्या तोंडचे उद्‌गार ऐकतांच स्विच् ऑफ करून ‘पडल्या-पडल्या’ तिच्याशीं प्रेमाच्या गुजगोष्टी करणें कुठें ?–आणि बारा वाजले तरी झोप येत नाहीं, आतां वाचणेंही पुरे–असा विचार करून ढेकणांच्या हल्ल्याला तोंड देत देत अंथरुणावर तळमळत पडणें कुठें ?

नवविवाहित नवरा बायको माहेरीं गेली असतांना तिला ‘ प्रिये ’ पासून आरंभ केलेलीं व—‘ तुझ्या आगमनाची चातकाप्रमाणें वाट पहाणारा चकोर ’ असा शेवट असलेलीं प्रेमपत्रं पाठवतो, तर बायको ‘ प्रियकरा ’पासून आरंभ केलेलीं व ‘राघूच्या गुलगुल गोष्टी ऐकायला लवकरच येणारी तुमची मैना’ असा शेवट असलेलीं पत्रें पाठवते. चाळिशी उलटलेला गृहस्थ ‘ अनेक आशीर्वाद ’ अशी सुरुवात करून मध्यंतरीं हवापाण्याच्या गप्पा मारून तिकडील वडील मंडळींस नमस्कार–लहानांस आशीर्वाद ’ असा शेवट केलेलें एखाददुसरें पत्र पाठवतो, तर त्याची पाव डझन पोरांमुळें हैराण झालेली व गलितगात्र अशी बायको ‘ न. वि. वि. ’ अशी सुरुवात करून ‘ तुमची सौ. ’ असा पत्राचा शेवट करते. गांधी-जिना, गांधी-खरे, सुभाष-खरे वगैरे राजकीय पुढाऱ्यांचा पत्रव्यवहार वाचण्यापेक्षां वरील प्रकारचा पत्रव्यवहार वाचायला मिळेल तर—?

कुत्र्याला कुठें एकटा सोडूं नये, नाहीं तर तो कुठें जाऊन शेण खाऊन येईल ह्याचा नेम नाहीं—त्याचप्रमाणें नवऱ्याला एकटा सोडूं नये, हें आजकालच्या व्यावहारिक जंत्रींतील पहिलें तत्त्व आहे. बायको माहेरीं असतांना नवऱ्याची एखाद्या स्त्रीशीं ‘ घसट ’ किंवा ‘ लांडेलगट ’ च्या सुरावर ‘ स्त्री-लगट ’ झाली, तर तो प्रेमपाशांत हटकून अडकतो. बायकोच्या विरहावस्थेंत ‘त्या’साठीं तहानलेला नवरा मदिरा पिऊन ‘ती’ तहान शमवूं लागतो. संसारांत गुंगून जाण्याऐवजीं मदिरेच्या कैफांतच हा गुंग होतो, चैनीबाज होतो. निरनिराळ्या ‘ बाजींत ’ अडकतो; आणि स्वतःला मोठ्या अभिमानानं ‘बाजी’राव म्हणवून घेतो.

हा लेख वाचल्यानंतर–बायका माहेरीं जाण्याचा नवऱ्यापाशीं हट्ट धरणार नाहींत अशी मला आशा आहे. लग्न झालेले पुरुष वाचक ह्यापुढें आपल्या बायकांना माहेरीं पाठविणार नाहींत. लग्नास ‘ होतकरू ’ झालेले तरुण लग्नानंतर बायकोला आपल्या आकर्षणाच्या दावणींत बांधून ठेवतील; पण ज्यांचें लग्न होत नाहीं असे वाचक ‘ सुस्कारे ’ टाकीत हा लेख संपवतील.

★ ★ ★

४

## वठलेला वृक्ष—!

खरोखरच फार पूर्वी त्याच्या हृदयकांठावर नीट जोपासनेनें वाढविलेल्या वेली आनंदरूपी वाऱ्याच्या झुळक्यानें नाचत बागडत असत. जवळच्या नदींतील पात्रावरून वायूच्या नाना लहरी आल्यानें त्या वृक्षावरील वेली मागेपुढें डोलूं लागतात.

आयुष्याचा शरद्‌ऋतु जें बालपण त्यांत तर वृक्षाला आनंदाच्या सागरांत पोहत असल्याचा भास होत असे. संकटाचा सोसाटयाचा वारा आला तरीही तो उमगत नसे; किंवा वांकत नसे. पण त्यामुळें त्याच्या शरीराला जखमा होऊन त्याला क्षयाची बाधा झाली कीं काय त्याचा संशय येऊं लागे. त्याच्या सान्निध्यांत असतांना तो सर्वांना आल्हाद देत असे. त्यामुळें तो सर्वांना हवासा वाटे. त्यावरील वेली पूर्ण विकसित झाल्या होत्या. जिकडे तिकडे फुलांचा सडा पडून वासाची दिवाळी साजरी केली जात होती. ' फुलें ' म्हणतांच मनुष्य मिटक्या मारूं लागतो—नुसत्या नामस्मरणानें एवढा आनंद, तर त्याच्या सन्निध जाऊन लोकांनीं त्याचा मृदु सौरभ घेतल्यानंतर—त्याच्या टवटवीत सौंदर्यावर दृष्टि फेकल्यानंतर—त्यांना आपण कोठें उभे आहोंत ह्याची विस्मृति पडून त्या वृक्षावर आनंदानें विहार करणाऱ्या पक्ष्यांच्या सहज-मधुर ध्वनींनीं लोक दुःख विसरून जात व त्याच्या धाडसाची स्तुति करीत.

मेघाच्या वर्षावालाही ज्यानें दाद दिली नाहीं, प्रचंड वाऱ्याच्या मर्दुमकीला जो हार गेला नाहीं, त्या वृक्षाची ते स्तुति करीत. आणि अशा त्या विस्तीर्ण छत उत्पन्न करणाऱ्या कारागिराची-एवंच परमेश्वराची—ते मनोभावानें स्तुति करीत. अशा ह्या

रमणीय सृष्टीच्या छायेचें अवलोकन करीत कवि आपला वेळ घालवीत. त्या वेली-भोंवतीं असणाऱ्या फुलांचा जणूं काय शालूच त्यांनीं पांघरला अशी कल्पना कवि लोक करीत.

पण त्या वृक्षाला त्याच्या आयुष्याच्या वसंतऋतूंत म्हणजे तारुण्यांत पुढें येणाऱ्या परिस्थितीची कल्पना तरी होती का ? पुढें आपण छिन्नविच्छिन्न होऊं, आपली शोभा जाऊन लोक आपणाकडे तिरस्कारानें बघतील, आपण वाळून जाऊन, लोक आपला कांटा त्यांच्या वाटेंतून उपटून काढतील...छेः छेः ! त्याला ह्या गोष्टीची वार्ताही नव्हती.

आणि कशी असणार ? लहान मुलांना आपणांवर पुढें संकटें येणार आहेत ह्याची कल्पना तरी असते का ? म्हणूनच नाहीं का म्हटलंय् कीं " लहानपण दे गा देवा, मुंगी साखरेचा रवा. "

त्या वृक्षाची लोक काळजी घेत. स्वतःच्या प्रेमरूपी जलाचें सिंचन करून त्याला सुंदर ठेवीत.

होय ! तो वृक्ष म्हणेल, माझ्या कर्मानेंच मी माझ्यावर संकट ओढवून घेत आहें ! पण म्हटलंय् ना " चूक होणें मानवी आहे. " प्रत्येकाच्या आयुष्यांत चुका होतच असतात. सोसाट्याचा वारा आला असतांना मीसुद्धा उपटून जात नसें, पण आज पाहा माझी स्थिति !...क्षयी माणसांप्रमाणें झाली आहे.

अहंकार ! नि दुसरं काय ? हा अहंकारच मानवी जीवनाच्या नाशाला कारण होतो. माझ्या अहंकारानेंच माझा घात केला. एके काळीं लोक माझ्याकडे आपण होऊन येत, पण आज माझ्याकडे तिरस्कारानें बघायलासुद्धा येत नाहींत. कां ? तर म्हणे माझ्या-वर भुतें खेळतात ! वा रे अंधश्रद्धा ! !

साहजिकच आहे. पैसा असेतोंपर्यंत मानव भूत पिशाच्च सगळेजण जमा होतात. पण पैसा संपला, कीं लांबूनच कावकाव करूं लागतात.

माझा गर्व नाहींसा झाला, मी आज दीन याचनेनं तुमच्याकडे पाहात आहें.

**पूर्वीं फुलांचा गालीचा पसरून तुम्हांला माझी ' कला ' दाखवीत असें. पण आज माझें जीर्ण झालेलें ' जीवन ' तुम्हांला दाखवावें लागत आहे.**

ऐश्वर्याच्या शिखरावर असतांना लोक बाबासाहेब, तात्यासाहेब म्हणतात. पण त्या शिखरावरून दारिद्र्याच्या खोल दरींत पडलं कीं 'बाब्या' म्हणून आपली विटंबना करतात.

माझी तीच स्थिति झाली आहे. **पूर्वीं मला 'बहरलेला वृक्ष' म्हणत– नि आतां म्हणे 'वठलेला वृक्ष!'**

★ ★ ★

५

# चोराची बायको !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ........

घेई रे सोनुल्या घांस–प्रीतिचा
राहूं दे हांसरा चंद्र मुखाचा
हा चिमणीचा–हा मोराचा
हा बघ गोड किती–आपुल्या कपिलेचा घांस हा प्रीतीचा !
" नीज हं बाळ-शंपलं ऽ ऽ–नीज आतां !
अडगुलं मडगुलं सोन्याचं कडबुळं रुप्याचा वाळा, तान्ह्या बाळा
तीट लावूं "

सुधा असें म्हणत आहे तोंच कमलाकर–सुधेचा नवरा–आंत आला.

" जेवायचं ना ? तयार झालाय् स्वैंपाक ! " सुधा आर्जवानें म्हणाली.

प्रत्येक प्राणिमात्राच्या पाठीमागें–मग तो श्रीमंत असो कीं गरीब असो–दुःख हें हात धुवून लागलेलेंच असतें. हल्लींच्या व्यापारी जगांत कोठल्याही गोष्टीला वशिला लागतो. पण दुःख कोठल्याही वशिल्याचा विचारच करीत नाहीं मुळीं !!

कमलाकरानें सिगारेट पेटविली आणि कोचावर बसला तो ! सिगारेटमधून निघणाऱ्या धुराच्या वलयाकडे पाहात तो बुटाचे बंद सोडूं लागला. बुटाचे बंद सोडणें माणसाच्या हातांत आहे, पण स्वतः ोंवतालच्या परिस्थितीचीं बंधनें तोडणें आपल्या का हातांत आहे ?

पुन्हा एकदा त्यानें सुधेच्या चेहेऱ्याकडे पाहिलें. आणि आपल्या अशा वागण्यानें खरोखरच सुधेला किती त्रास होत असेल ह्याची त्याला कल्पना आली.

सुधा त्याच्याकडेच पाहात होती.

बाळ अरुणला तिनें पाळण्यांत ठेवलें होतें—

चिमुकल्या जीवाला मोठ्या जीवांच्या दुःखाची काय कल्पना ?

" चलतां ना ? " तिनें जरा भीतभीतच विचारलें.

" येतों पण मला भूक नाहीं फारशी ! " कमलाकार म्हणाला.

" थोडं खा म्हणतें मी ! "

" बरं चल " सुधेच्या आग्रहावर कमलाकर उठत म्हणाला.

● ● ●

कमलाकर आतांशा असें कां वागत आहे ह्याचा सुधेला अंदाजच करतां येईना. दुसऱ्याच्या हृदयाचा थांग स्वतःच्या हृदयाला कसा लागणार ?

कमलाकर दारूच्या व्यसनांत अडकला असेल असें म्हणावें तर कधींही त्याच्या तोंडाला घाण येत नसे. आणि दुसरा जिवंत पुरावा म्हणजे त्यानें दारुबंदीच्या चळवळींत प्रामुख्यानें भागही घेतला होता.

मग असें कां ? सुधेला प्रश्न पडे.

बरं—कोणा स्त्रीच्या पाशांत अडकला असेल असें म्हणावें तर तेंही शक्य नव्हतें. कारण तो सुधेवर इतकें जिवापाड प्रेम करी कीं, कोणाची दृष्ट लागायची एखादे वेळेस त्याला, असें सुधेच्या भाबड्या मनाला वाटे !

मग असें कां ? पुन्हां सुधा गोंधळून जाई.

प्रश्नांच्या फेऱ्यांतून पार पडणें चक्रव्यूहांतून पार पडण्यापेक्षांही कठीण आहे.

तिला हें माहीत नव्हतें, कीं कमलाकर अलीकडे रेसेस् खेळूं लागलाय म्हणून !

कमलाकर बँकेंत नोकरीला होता. महिना अडीचशें रु. पगार असल्यावर त्यांच्या संसारांत दुःखाची छाया कशी पडणार ? वर्ष दीड वर्ष संसार सुखाचा चालला होता.

पण अरुणाचा जन्म झाला आणि...

त्यांच्या संसाराला उतरती कळा लागली.

तरी सुधा हा अरुणाचा पायगुण असें कधींच म्हणत नसे. कारण त्या चिमुकल्या जीवाचा त्यांत काय बरं दोष होता ?

कमलाकरावर तीन दिवसांपूर्वीच बँकेचें वॉरंट सुटलें होतें. बँकेंत पांच हजार रुपयांची अफरातफर केल्याच्या आरोपावरून त्याला पकडण्यास सी. आय. डी. खात्यास कळविण्यांत आलें होतें.

पण सुधेचा भाऊ सुधाकर ह्यानें बँकेच्या मॅनेजरची गांठ घेऊन त्याला आठवडाभर थांबण्यास सांगितलें. आणि सुधेला 'कमलाकर बँकेच्या कामासाठीं बाहेरगांवीं गेलाय्' असें खोटेंच सांगितलें !

कमलाकर तीन दिवस फरारी होता—व वर वर्णन केलेल्या प्रसंगीं तो नुकताच घरीं आला होता.

आपण पुष्कळ पैसे मिळवूं व सुधेला नि अरुणला सुखासमाधानाच्या अत्युच शिखरावर नेऊन बसवूं ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. आणि भरमसाट पैसे मिळविण्यासाठीं त्यानें रेस खेळायला सुरुवातही केली होती. आणि या आकाबाईच्या फेऱ्यांत त्याची बरीचशी इस्टेट संपुष्टांत आली होती !

व त्यांतच त्याच्या एका जीवश्चकंठश्च मित्रानें—ज्यानें एकदा कमलाकराचा जीव वांचवला होता—त्यानें कमलाकराजवळ कर्ज निवारण्यासाठीं पांच हजार रुपये उसने मागितले !

कमलाकर श्रीमंत आहे, पैसे बाळगून आहे हें त्यास माहीत होतें. पण तो रेस खेळूं लागला हें मात्र त्याला ठाऊक नव्हतें. आणि म्हणूनच अडचणीच्या प्रसंगीं तो मदत करील अशी त्या मित्राची पूर्ण खात्री होती. आणि ती खरी होती !

आणि कमलाकरालाही नाहीं म्हणवेना—

अशा मित्राला मदत करायची नाहीं मग करायची तरी कोणाला ?

मनुष्य परिस्थितीच्या जंजाळांत सांपडला कीं त्याचें डोकें ठिकाणावर रहात नाहीं. दुसऱ्यांशीं बोलूं नये असें त्यास वाटूं लागतें. ह्याबद्दल त्याला वाईटही वाटतें. पण परिस्थितीपुढें तो तरी काय करणार ?

कमलाकराचीही तीच स्थिति झाली. अलीकडें तो सुधेशीं बोलतही नसे.

पण मित्राला पैसे कोठून द्यावे ह्या विचारानें कांहीं त्याला सोडलें नाहीं.

आणि एक दिवस त्यानें बँकेंतून पांच हजार रुपये हातोहात पळविले !

त्याचें मन त्याला सांगत होतें कीं, कमलाकर, चोरी करूं नकोस. चोरी करणें पाप आहे. जगांत असत्याला केव्हांतरी वाचा फुटणारच !

तर दुसरें मन काय म्हणे, " कमलाकर, ज्यानें तुझा जीव वांचवला त्या प्राणदात्याला तूं मदत करणार नाहींस, मग कोण करणार ? ह्या चोरीचें पाप ईश्वराच्या दरबारांतील चित्रगुप्ताच्या वहींत पुण्याच्याच बाजूला पडेल ! "

अंगणांत मुलें लपंडाव खेळत असलीं तर विश्रांति घेत असलेल्या माणसाला नाहीं का त्रास होत ? स्वतःच्या दुहेरी मनाचा लपंडाव चालला असतांना त्रास होणारच !

त्याच दिवशीं मॅनेजरनें पैशाची मोजदाद केली. पांच हजार रुपये कमी पडले.

मॅनेजरला कमलाकराचा संशय आला—पण कमलाकर फरारी झाला होता !...

तो वरील प्रसंगीं नुकताच घरीं आला होता.

● ● ●

पोटाची आग शांत करण्यासाठीं जेवणाची जरूरी असते, पण हृदयांत भडकलेली आग कोण शांत करणार ?

कमलाकर जेवण झाल्यावर खोलींत येरझारा घालूं लागला. त्याच्या मनाल बरें वाटेना !

आपल्या संसारांतील भागीदारापासून आपण एक गोष्ट सारखी लपवीत आहोंत, ह्या गोष्टीची त्याला रुखरुख लागून राहिली होती.

दुसऱ्याशीं अबोला धरला तरी मनाशीं धरतां येत नाहीं !

तो तसाच शतपावली करीत होता. आणि सुधा आंतलें आवरण्यासाठीं बाईला मदत करीत होती.

त्यानें दारांतून सुधेच्या कृश झालेल्या शरीराकडे पाहिलें. अरुणला दूध पाजायलासुद्धां तिच्या शरीरांत त्राण उरलें नव्हतें !

वाईट वाटूं लागलें त्याला ! पण होऊं नये ती गोष्ट झाल्यावर वाईट वाटून तरी काय उपयोग ?

इतक्यांत सुधा आंतलें आवरून बाहेर आली, आणि आपण आनंदित आहोंत असें सकृत्‌दर्शनीं दाखविण्यासाठीं तोंडावर बळेंच स्मित खेळवीत उभी राहिली.

" सुधा ! " कमलाकरानें हाक मारली.

" काय ? "

काय बोलावं तरी काय ? हृदयांतलें गुपित ओकून टाकावें का ? असा कमलाकराला विचार पडला.

" सुधा तुझी प्रकृति बिघडलेली दिसतेय् ? "

" तुमची कां माझी ? " आर्यपत्नीनें उत्तर दिलें. " प्रवास कसा काय झाला ? "

बोलावं–सांगावं–कीं सांगूंच नये–केव्हांतरी गुपित फुटणारच ! कमलाकर स्वतःच्या मनाला विचारूं लागला !

त्यानें निश्चय केला आणि तिला सगळी हकीगत सांगून टाकली.

" मग त्यांत काय एवढं ? " ती हसत म्हणाली, " माझे दागिने आहेत. ते विकावे आणि पैशाची भर करावी."

" छान ! हें उत्तर आर्यस्त्रीला म्हणून शोभून दिसेल. पण तुझ्या आईनें मरतांना तुला दिलेले ते दागिने घ्यायला मी राजी नाहीं. ती तुझी इस्टेट आहे. ती मी काय म्हणून घेऊं ? "

" असं काय करावं गडे ? " सुधा पदरानें डोळे पुसूं लागली.

त्याच्याही मनावर परिणाम झाल्याखेरीज राहिला नाहीं.

पण स्वाभिमान आहेना ?—

कमलाकरानें तुरुंगांत जायचा विचार कायम केला.

पण ! त्याला काळजी होती सुधेची नि लहानग्या अरुणची.

मनुष्याला स्वाभिमान सारखा बोंचतच असतो. कमलाकरानें पुनः विचार केला–तो विचारांत असतांच सुधाकर आंत आला.

" दादा–" सुधेनें कळवळून हाक मारली.

तिघांनीं बराच वेळ विचार केला. दोघांनीं त्याची नानापरीनें समजूत घातली. पण कमलाकरानें तुरुंगांत जायचा निश्चय कायम केला.

पण पुन्हा हृदयांतून कोणी हडसून खडसून विचारी, " कमलाकर, बायकोची व मुलाची वाट काय ? "

पण स्वाभिमान...

केलेल्या अपराधाबद्दल प्रायश्चित्त घेणें योग्य आहे, हें कमलाकरला पटलें !

पण सुधा आणि अरुण ह्यांचा विचार त्याचा पाठपुरावा करीतच होता.

त्याचें मन हेलकावे खाऊं लागलें–

लोक काय म्हणतील ?

कमलाकरानें सुधाकराला ' दोघांना जप ' एवढें सांगून शरमेनें मान खालीं घातली. व्यसनापायीं ओढवलेल्या भोगाबद्दल प्रायश्चित्त घ्यायचें त्यानें ठरविलें !

आणि तुरुंगाचे दरवाजे सताड उघडे असून कमलाकराच्या आगमनाची वाट पहात होते !

कमलाकरावर रीतसर खटला होऊन त्याला शिक्षा झाली !

आणि समाज मात्र सुधेला " चोराची बायको " म्हणून डिवचूं लागला !!

★ ★ ★

६

# अंधकवि—!

तो एक आंधळा होता.

व्यंग असलेल्या माणसांस दुसऱ्या एकाद्या कलेंत अंग असतें हें खरें आहे.

त्याला गाण्याच्या कलेंत अंग होतें. त्यानें गाण्याला सुरुवात केली कीं आजूबाजूचे लोक कान लावून गाणं ऐकत. हा भावी के. सी. डे. आहे असें लोकांनीं भविष्य केलें होतें. पण भविष्य खरें होत असतें तर मनुष्यानें कांहींही न करतां स्वस्थ बसून भविष्याची मार्गप्रतीक्षा करीत दिवस काढले असते. दुर्दैव तर त्याच्या पांचवीलाच पुजलं होतें.

रस्त्यांत टाकलेला पैसा त्याला दिसत नसे. मग तो कोणास तरी सांगून घेत असे. पण लोक तरी कमी का डँबीस होते. त्याच्या थाळींत पैसा टाकण्याचा ते हावभाव करीत. कांहीं जण तर दोनचार पैसे त्यांतूनच उचलीत. पांचसहा आण्यांपर्यंत तो रोज मिळवी.

त्याची आई नी तो दोघेंजणच या अफाट जगांत रहात होतीं. त्यांच्या नात्या-गोत्याचें कोणीच माणूस त्यांच्याजवळ नव्हतें.

आणि...आणि त्याची आईही आंधळीच होती.

तो आईजवळ रोज झालेली जमा आणून देत असे. आणि मग त्यांतले दोन आणे घेऊन तो हॉटेलांतून कांहींतरी आईस व स्वतःकरितां आणी.

एक दिवस तो रस्त्यानें गाणें म्हणत चालला होता. त्याच्या भोंवतीं खूप गर्दी जमली. त्याला लोकांनीं ' पांडुरंग ध्यानीं ' हा अभंग म्हणायला सांगितला. त्यानें तो एवढा चांगला म्हटला कीं, भराभर लोकांनीं काय हाताला लागेल तें त्याला दिलें.

तो हर्षभरानें घरीं गेला. आई बाहेर गेली होती. आतांपर्यंत यंव करूं अन् त्यंव करूं अशी त्याच्या इच्छेची भरारी या महत्त्वाकांक्षेच्या आकाशांत भराऱ्या मारीत असे. पण ती पूर्ण होण्याजोगी परिस्थिति आज आली.

त्यानें बरोबर पैसे मोजतां यावेत म्हणून शेजारच्या मित्राला हांक मारली.

इतक्यांत आई आल्यामुळें दरवाजा वाजला. महादूनें–तो आंधळा–तिच्याकडे पाहिलें. पण पाहून दिसणार काय ? मनुष्यास झालेला आनंद त्याच्या चेहेऱ्यावरून अंदाजितां येतो. पण आंधळ्यांना तें सुख कोठलें मिळायला !

आईनें विचारलें, " महादू, कोठले पैसे हे " तिचे डोळे अश्रूंनीं भरलेले दिसत होते. अंतःकरण आनंदाश्रूंनीं तुडुंब भरलें होतें.

आईस आनंद झालाय कीं रडतेय ती, याचा अंदाज त्याला करतां येईना. त्यानें उत्तर दिलें, " मी गाणं म्हणत असतां लोकांनीं मला दिले. "

आईला बरं वाटलं. कारण मुलानें दारिद्र्याच्या बागुलबोवाला भिऊन चोरी करूं नये हीच तिची एक इच्छा. तिनें त्याला पोटाशीं धरून प्रेमाश्रूंचा पाऊस पाडला.

कधींहि न मिळणारे पैसे आपल्याला मिळाले म्हणून आई आज आपल्याला कुरवाळीत आहे हें त्याला कळून आलें.

इतक्यांत आईनें त्याला पोटाशीं घट्ट धरून म्हटलें " महादेव. "

आयुष्यांत कितीहि पैसे मिळाले तरी आनंद होणार नाहीं एवढा आनंद तिच्या हृदयाच्या कोपऱ्यांपासून निघालेल्या हांकेनें महादूला झाला.

त्यानें आईच्या छातीवर डोकें ठेवलें. आणि तो म्हणाला, " आई मी आज हॉटेलांतून तुला जिलबी घेऊन येतों. " असें म्हणून तो ताडकन् उठला व पैसे घेऊन—

" एक बंगला बने न्यारा... " असें गुणगुणत बाहेर पडला.

★ ★ ★

७

# आमची स्वर्गावर स्वारी !

डिसेंबर महिन्याचे दिवस–थंडी मी म्हणत होती. आणि सकाळीं येवढें धुकें पडे कीं युरोपियन माणूस ओळखणें खास कठीण गेलें असतें ! आणि दुपारींसुद्धां येवढी थंडी पडे कीं सनातनी म्हणवणारे वीर सुद्धां अंगांत सदरे आणि बंड्या घालून बेधडक जेवावयास बसत. मग सुधारकांची गोष्ट तर राहूं द्याच ! रात्रीचे आठ वाजले कीं थंडीला अधिकच जोर चढे. पुण्यांतील शाळा कॉलेजें तर दोन दोन वाजतां सुरू होत. व कोर्टांना ग्रहणाचीसुद्धां जेथें सुट्टी मिळते तेथें दोन दोन महिने कोर्ट बंद राहिल्यास काय बिघडतें असें ठरविण्यांत येऊन दोन महिने कोर्टस् बंद ठेवण्यांत आलीं होतीं असें माझा जिवलग दाजी माझ्याजवळ सांगत होता. कारण त्याच्या आतेचा मावस मामे चुलता स्टँप वेंडर होता ! ! आणि वुलन कोटांना–मफलर्सना स्वेटर्सना–रगांना येवढा भाव आला, कीं कित्येक दुकानदारांनीं गहाण पडलेलीं घरें परत मिळवून वाड्या उठवल्या असें म्हणतात.

याच दिवसांत आम्ही बाहेर गांवीं जावें असा आमच्या स्नेहसंवर्धन मंडळाचा कार्यक्रम ठरला. ( हल्लीं तें मरहूम आहे ! ईश्वर मंडळाच्या आत्म्यास चिरशांती देवो ! ! ) पण जायचें कोठें हा प्रश्न पुढें उभा राहिला ! सर्वांनुमतें शेवटीं स्वर्गावर जावें असें ठरविण्यांत आलें. डोक्यास डोकें घासून आम्ही येवढी चर्चा केली कीं दुसरे लोक ' टकले ' म्हणून आमचा नामनिर्देश करूं लागले.

पण–स्वर्गावर जायला पासपोर्ट पाहिजे. तो कसा मिळणार याची पंचाईत पडली. पण स्टॉक्स अँड शेअर्समध्यें सफा बुडालेला माझा मित्र पदमजी यानें " हेवन बँक

लिमिटेड" मध्यें स्वर्गावर जाण्याचा पासपोर्ट देतात अशी आलमगिरी बातमी आणली. व त्यांनींच वशिले लावून आम्हां पांच जणांचे पासपोर्ट मिळवले !

स्वर्गावर स्वारी ही आजारी पडून-किंवा ॲक्सीडंट होऊन अगर आत्महत्त्या करूनच फक्त करतां येते अशी आमची आजपर्यंतची समजूत होती. पण तेथें जाण्यास जिवंत राहून पासपोर्ट मिळतो हें समजल्यापासून मला–करंदीकरांना आपण पावसाचें केसरींत वर्तविलेलें भविष्य खरें ठरल्यावर जसा आनंद होईल–त्याहून किंबहुना अधिक आनंद झाला. पूर्वी धारातीर्थी पडलेले वीरच स्वर्गी जातात असा समज असे. ( तो चुकीचाही असूं शकेल. ) हल्लींच्या समजुतीप्रमाणें हार्ट फेलनें मेलेलींच माणसें स्वर्गाला जातात असा समज आहे.

स्वर्गाला जाण्याचा हा आमचा पहिलाच प्रयत्न असल्यामुळें व "एका कोळियानें" हें गाणें वीसदां मार खाऊन पाठ केलें असल्याकारणानें आम्ही कितीही संकटें आलीं तरी नामोहरम होणें शक्य नव्हतें. व "माझ्या स्वर्गावरील प्रवासांतील ठेंचा, खांचखळगे आणि गंमती" ही प्रवास-माला लिहून आपला खर्च भरून येईल हें मनाशीं पॅकबंद केलेलें ध्येय होतें. या गोष्टीमुळें स्वर्गावर स्वारी करण्यास आम्ही फारच उत्सुक झालों होतों.

आमचे मित्र गोपूनाना: हे एका बिस्किटाच्या कारखान्यांत नोकरीला होते. कारखान्याचें दिवाळें वाजल्यामुळें त्यांना आमच्याबरोबर येण्यास कसलीच हरकत नव्हती. आमचे दुसरे मित्र बन्या बापू हे अद्यापि वयाच्या बत्तीस वर्षापर्यंत मॅट्रिकला बसतच होते. पण सालाबादप्रमाणें त्यांचा निकाल लागत असल्यामुळें व मॅट्रिक परीक्षेस बसण्याचा उच्चांक त्यांना साधावयाचा असल्यामुळें तेही आमच्या बरोबर येण्यास तयार होते ! आमचे तिसरे मित्र दाजी हे लेखक होते. पत्रकारांच्या गांठी घेऊन त्यांचा परदेशांतील अनुभव व त्यांचा परिचय ते विचारून लिहीत. व आपलाही परिचय लोकांनीं छापावा ही त्यांची इच्छा ! त्यामुळें दाजी येण्यास राजी होते. चौथे मित्र श्री. चिमणराव हे त्यांची पहिली पत्नी मृत झाल्यामुळें ( व दुसरें लग्न होत नसल्यामुळें ) मनास आलेला थकवा शांत करण्यासाठीं येणार होते. आणि मी कांहींच उद्योग नसल्यामुळें जाणार होतों !!!

आम्हीं कपडे काय काय घ्यायचे हें ठरविण्यांत आख्खी रात्र दवडली. धोतरावर हॅट घालणें कायदेशीर आहे कीं नाहीं याची बातमी आम्हीं बॅंकेंतून काढली. निर-

निराळे साहित्यिक हॅट–फोटो–रुमाल–पगडींत कसे दिसतील असा वाद दाजीनें उकरून काढला. पण तो सांगून माझा फज्जा करून घेण्यास मी तयार नाहीं.

हिंदुस्थानांतील नाणीं स्वर्गांत चालणार नाहींत हें समजल्यामुळें हेवन बँकेंतून तीं एक्सेंज करून घेतलीं. प्रत्येकावर His Highness the Emperor of Heaven Indra असा छाप होता. व I promise to pay...याच्या खालीं ब्रह्मदेवाची दस्तुर खुद्द होती ! !

आणि अखेर तयारी पुरी झाल्यावर १४ जानेवारीस आम्हीं हिंदुस्थान सोडलें.

कोणच्या वाहनांनीं स्वर्गास प्रवास करण्यास सुरवात केली–येथील रेल्वे व स्वर्गांतील रेल्वे यांच्या सोयी गैरसोयी वगैरेचीं ‘ बखले छाप ’ वर्णनें करण्यास माझी लेखणी धजत नाहीं हें प्रांजलपणें मी कबूल करतों.

अशा तऱ्हेनें चंद्र–मंगळ वगैरे वरील प्रवास करीत करीत आम्ही स्वर्गांवर येऊन पोहोचलों. तेथेंही पाहतों तो सूर्य आपल्याला भयंकर राग आलाय हें दाखविण्याकरितां आम्हांवर आपल्या प्रखर किरणांचा मारा करीत होता. पृथ्वीवर सूर्य उगवल्यानंतर चंद्र दिसत असला तरी त्याचें तेज पडत नाहीं. पण येथें चंद्रसूर्यांचा उजेड सारखाच असतो. हें दोन भावांमधील प्रेम वाखाणण्यासारखें आहे. हें नमूद करून घेण्यासाठीं आम्ही डायरी काढली, तोंच कांहीं वर्तमानपत्रांचे वातमीदार आले. एकानें मी ‘ स्वर्गशक्ति’चा बातमीदार असल्याचें सांगितलें.—त्यांबरोबर पृथ्वीवरील ‘ कर्जशक्ति’ची मला आठवण झाली. त्याच्या खोट्या रिपोर्टाप्रमाणें हेही खोटा रिपोर्ट छापतील असें वाटल्यावरून आम्ही त्यांस माहिती देण्याचें नाकारलें. तेव्हां बाकीच्या म्हणजे–स्वर्गकाळ–स्वर्गवृत्त, स्वर्गमान्य, अप्सरा, हेडिंबा इत्यादि वर्तमानपत्रांच्या बातमीदारांनीं आम्हांवर बहिष्कार टाकून तेथल्या तेथें आमचा निषेध करण्यासही कमी केलें नाहीं. माझ्या हातांत असलेल्या ‘ सकाळ ’कडे एकाची नजर जातांच ‘ नानावटी ’ हें शब्द उच्चारीत तो बेशुद्ध पडला. पण बाकीच्या बातमीदारांनीं त्याला सावध करून–ते सर्वजण विमानांत बसून चालते झाले.

तोंच बन्याबापू ओरडला. ‘ अरे, तो पहा, शनिवार वाडा.’

“ बन्या वेडबिड तर नाहींना लागलंय ? त्या वाड्याची लवकरच येथें रवानगी करण्याचा तुझा विचार दिसतोय ” मी म्हणालों.

“ मग काय दिसतंय रे तें ! ”

“ चला आपण जाऊन पाहूं ! ” मी म्हणालों.

तेथें जाऊन चौकशी करतां ती नर्तन शाळा असल्याचें कळलें. हॉलमध्यें बऱ्याचशा स्त्रिया नाचत गात होत्या. कांहींनीं शेपटे–अंबाडे–चकरे–क्रॉप्स केले होते. कांहीं सकच्छ तर कांहीं विकच्छ पातळांत होत्या. एक अप्सरा पृथ्वीवर पाप्युलर झालेलें व शांता आपटेनीं म्हटलेलें " एक होता राजा–एक होती राणी " हें गाणें म्हणत होती.

तेथून बाहेर पडून आम्हीं मोठ्या रस्त्याला लागलों. तोंच लांबवर एक मोठी इमारत दिसली. त्या इमारतीशिवाय स्वर्गावर दुसरी इमारत नाहीं असें सांगण्यांत आलें.

वाटचालीच्या श्रमानें थकवा येईल या समजुतीनें आम्ही जवळ आणलेला रेडिओ सुरू करण्याचें ठरविलें. पण गाणें ऐकूंच येईना ! अखेर येथें वेव्ह लेंग्थ नसेल अशी गोपूनानांनीं शकल काढल्यावरून आम्ही तो नाद सोडून दिला. तेव्हां बऱ्या बापूनें त्याच्या आजोबा जवळून शिकलेली भगवद्गीताच म्हणावयास प्रारंभ केला. मी झिंजोटी रागांत वंदेमातरम् म्हणेन असें सांगितल्याबरोबर त्यानें नाद सोडून दिला. रात्र कशी अजून पडत नाहीं असा आम्हांस विचार पडला. व झोंप म्हणून येईना. तेव्हां आतां चालतच ती इमारत गांठावी म्हणून आम्हीं झपाट्यानें जाऊं लागलों.

असे आम्हीं आठ दिवस चाललों होतों. वाटेंत लागणाऱ्या झाडांवरून आंबे, कंदमुळें, फणस यांवर जीव तगावला ! तेव्हां कोठें आम्हांस चौपाटीच्याही कित्येक पट लांबरुंद असा समुद्र दिसला. व त्याही पलीकडे ती इमारत होती. आतां हा एक समुद्र तरून जाणें कांहीं आम्हांस शक्य नव्हतें, तेव्हां पाणी तरी प्यावें म्हणून आम्हीं ओंजळी केल्या. पण त्यांत काय ? कांहीं नाहीं. ओंजळ कोरडी ठणठणीत !

" अमृत असेल हें ! " श्री. चिमणराव म्हणाले.

" खरं आहे चिमण्या ! आपल्या सारख्या पापी इसमांना कोठलं अमृत प्यायला मिळणार ? नी देव दिसणार ? आपण पापी ! पापी इसमांना देवाचें दर्शन होत नाहीं म्हणतात. खरं आहे हें ! " बऱ्याबापू उद्गारला.

आतां येथें काय आहे पाहाण्यासारखें असें ठरवून आम्ही परतलों. पण स्वर्ग–स्वर्ग म्हणतात तो हाच का ही शंका आम्हांस भेडसावूं लागली. आतां पृथ्वीवर गेल्यावर त्या पुराणांतलेंच वर्णन सांगण्याची पाळी येईल हें वाटून आम्ही खरोखरीच रडावयास लागलों.

● ● ●

" कां रे रडतोस ? " असें आईनें विचारतांच मी जागा झालों.

त्याच दिवशीं बन्याबापू वगैरे मित्रांना माझें स्वप्न सांगितलें. त्यांनींही आपणांस असेंच स्वप्न पडलें असल्याचा अभिप्राय दिला. अखेर थापा मारून आपण यावर एक लेख लिहूं ( म्हणजे संपादक महाशय तो साभार परत पाठवतील ! ) असें आम्ही ठरवलें.

" लेखक आहेस झालं " अशी वरेरकरी कोटी श्री. चिमणरावांनीं मारलीच !

★ ★ ★

८

* * *

# अरेरे ! पुण्यांत राम नाहीं !

" अरेरे ! पुण्यांत राम नाहीं ! "–कोण–कोण म्हणालं असं ? म्हणे पुण्यांत राम नाहीं. कोणाच्या मुखांतून ही अभद्रवाणी निघाली ? म्हणे पुण्यांत राम नाहीं ! कोणाची छाती झाली असं भर पुण्यांत बडबडायला ? म्हणे पुण्यांत राम नाहीं ! या पुण्यनगरींत राम नाहीं असं म्हणणारा कोण पापात्मा निघाला ? ह्या पुणें शहरांत राम नाहीं असं पुणेंकरांच्या नाकांवर टिच्चून बोलणारा कोण हरीचा लाल निघाला ? ज्याचें शरीर आखडलें आहे – ज्याची गति मंदावली आहे – ज्याची दातांची कवळी कोसळली आहे – ज्याची दृष्टि गेली आहे – ज्याचा बहिरेपणा वाढला आहे–तोच तोच असे उद्‌गार काढील ! असं म्हणणाऱ्याचं शरीर निर्जीव होईल–असं म्हणणाऱ्याची जीभ झडून पडेल ! –असं म्हणणारा अंध होईल–असं म्हणणारा नरकांत जाईल–असं बकणाऱ्याला वेडयाच्या इस्पितळांत पोंचवावं लागेल ! पण असें एकजण बोलला–बकला–म्हणाला–बडबडला ! म्हणे पुण्यांत राम नाहीं ! अहो संस्कृतिसंरक्षकांनो ! अहो धर्म मार्तंडांनो ! अहो अश्लील संशोधकांनो ! यावेळीं तुम्हीं कोठें आहांत ? यासमयीं तुम्हीं कोठें दडी मारली आहे ? या–या पुढें ! सारा–सारा अस्तन्या मागं ! खेंचा त्याला बाहेर ! हाणा त्याच्या पेकाटांत ! पण–मला सांगायला शरम वाटते, मला सांगायला लाज वाटते–माझ्याकडे कांहीं दिवसांपूर्वी उतरलेल्या–सिलोनहून जपानच्या भीतीनं पळून आलेल्या–रावणाच्या लंकेंतून पलायन करून आलेल्या–एका पेन्शनरानें–माझ्या घरांत– भर माझ्या तोंडावर–हे उद्‌गार काढले ! " अरेरे ! पुण्यांत राम नाहीं ! " माझ्या पुण्याला

त्यांनीं नांवें ठेवलीं ! माझ्या जन्मभूमीला त्यांनीं डिवचलं ! म्हणे पुण्यांत राम नाहीं. पुणें हें महाराष्ट्राचें केंद्र आहे. पुणें हें महाराष्ट्राचें काळीज आहे.. पुणें हें महाराष्ट्राचें नाक आहे. पुण्याला नावं ठेवणारा वेडा असला पाहिजे ! पुणेंकरांना डिवचणाऱ्याचें काळीज उलटें असलें पाहिजे ! म्हणे पुण्यांत राम नाहीं. दुसऱ्या कोणी असे उद्गार काढले असते तर मी त्याला तेथेंच 'राम' म्हणायला लावलें असतें—! पण मला सांगायला लाज वाटते–माझे स्नेही असं बोलले ! माझे स्नेही असं सांगायला धजले ! तरी–तरी–मी कांहीं केलं नाहीं. मित्र म्हणून त्यांना सोडून दिलं ! स्नेही म्हणून त्यांना जीवदान दिलं ! !

म्हणे पुण्यांत राम नाहीं ! ज्या पुण्यांतील रामेश्वर आणि तुळशीबाग या पवित्र देवळांत रामाची मंगलमूर्ती आहे, त्या पुण्यांत राम नाहीं ? ज्या पुण्यांत रामनवमीचा महोत्सव मोठ्या उत्साहानें गाजत असतो त्या पुण्यांत राम नाहीं ? ज्या पुण्यांत पेशवाईतील रामशास्त्र्यांसारखा निःस्पृह न्यायाधीश होऊन गेला, त्या पुण्यांत राम नाहीं ? ज्या पुण्यांत रामकृष्ण गोपाळ भांडारकरांसारखा प्राच्य विद्यासंशोधक होऊन गेला, त्या पुण्यांत राम नाहीं ? ज्या पुण्यांत राम गणेश गडकऱ्यांसारखा शेक्स-पिअरच्या तोडीचा नाटककार होऊन गेला, त्या पुण्यांत राम नाहीं ? ज्या पुण्यांत शिवरामपंत परांजप्यांसारखा कट्टर देशभक्त निपजतो त्या पुण्यांत राम नाहीं ? ज्या पुण्याच्या सदाशिव पेठेंत रामकृष्णबुवा वझ्यांसारख्या उस्तादी चीजा गाणाऱ्या गवयाचें वास्तव्य होतें, त्या पुण्यांत राम नाहीं ? ज्या पुण्यांत शांतारामबापूंनीं एकापेक्षां एक अद्वितीय बोलपट निर्माण केले, त्या पुण्यांत राम नाहीं ? ज्या पुण्यांत रंगभूमीच्या उत्कर्षाकरितां राजाराम संगीत नाटक मंडळी आपली पराकाष्ठा करीत होती, त्या पुण्यांत राम नाहीं ?

"अरेरे ! पुण्यांत राम नाहीं !" माझे सिलोनचे स्नेही असं कां बोलले ? म्हणे पुण्यांत राम नाहीं. पुण्यांत राम नाहीं–मग राम आहे कोठें ? पुण्यांत राम नाहीं–मग रामाचें वास्तव्य आहे कोठें ?–रामाचें वास्तव्य लंकानगरींत का आहे ? रामाचें राहण्याचें ठिकाण आहे कुठें ? कां–कां ते म्हणाले असं ? असं म्हणण्यांत त्यांन काय सुचवायचंय ? लोकमान्य टिळक पुण्यांत हयात असतांना पुण्यावर तारे जसे चमकत होते तसेच ते आजही आहेत. सूर्यही तसाच प्रकाशत आहे. मग–मग ते का म्हणाले असं ? त्यांना असं का म्हणायचंय कीं पुण्यांत चैतन्य नाहीं ? पुण्याची हवा चांगली नाहीं ? पुण्यांत विद्वान लोक नाहींत ? पुण्यांत हुषार कायदेपंडित नाहींत ?

पुण्यांत विद्यालयें नाहींत ? पुण्यांत डॉक्टर्स नाहींत ? पुण्यांत देशभक्त नाहींत ? पुण्यांत करमणूक नाहीं ? पुण्यांत खाणावळी नाहींत ? पुण्यांत हॉटेल्स नाहींत ? पुण्यांत मजा नाहीं ?–आणि–आणि पुण्यांत नटी नाहींत म्हणून ?–काय, काय म्हणायचंय त्यांना ?

पुण्यांत चैतन्य नाहीं ? नका–नका असं म्हणूं ? पुण्याइतकं चैतन्य दुसरीकडे कुठेंही नाहीं–पुण्याइतका उत्साह अन्यत्र सांपडायचा नाहीं ! पुण्यांत वसंतव्याख्यान-माला असो, ही गर्दी असते; पुण्यांत शिवाजी आखाड्यांत व्याख्यान असो, हा जमाव जमतो; पुण्यांत निजामपूरकर बोवांची कथा असो, ही गर्दी जमते; पुण्यांत क्रिकेटची मॅच असो, ही झुम्मड उडते. कोण–कोण म्हणेल पुण्यांत चैतन्य नाहीं म्हणून ! त्यांना असं का सांगायचंय कीं पुण्याची हवा बिघडली आहे ? त्यांना असं का सुचवायचंय कीं पुण्याची हवा खराब आहे ? पुण्यास काय नागपूर इतका उन्हाळा असतो ? पुण्यास काय जाकोबाबाद इतकी गरमी असते ? पुण्यांत काय मुंबईइतका पाऊस पडतो ? पुण्यांत काय चेरापुंजीइतका पर्जन्यराज रडतो ? बोला ! पुण्याची हवा चांगली नाहीं असं कोण म्हणेल ? त्यांना असं का म्हणायचंच कीं पुण्यांत विद्वान लोक नाहींत ? मिशांचे आंकडे वळवणारे रँ. परांजप्यांइतके आंकडे शास्त्रज्ञ आहेत कुठें ? कै. महामहोपाध्याय अभ्यंकरशास्त्री यांची स्मृति ठेवा ! लोकमान्यांना तरी स्मरा ! आगरकरांना आठवा ! शास्त्री पितापुत्रांचीं आठवण करा ! धोंडोपंत कर्व्यांना नजरेसमोर आणा ! वैजनाथ काशिनाथ राजवाड्यांना आठवा ! बोला ! पुण्यांत विद्वान का नाहींत ? त्यांना असं का म्हणायचंय कीं पुण्यांत साहित्यिक नाहींत ? तात्यासाहेब केळकर कोण आहेत ? दत्तो वामन पोतदार कोण आहेत ? आचार्य अत्रे ? कोण आहेत ? माधवराव जोशी कोण आहेत ? बोला, यांना तुम्हीं साहित्यिक म्हणणार नाहीं ? त्यांना असं का सुचवायचंय कीं पुण्यांत हुषार कायदेपंडित नाहींत ? अण्णासाहेब भोपटकरांकडे पाहा ! तात्यासाहेब गोखल्यांकडे पाहा ! काय–पुण्यांत डॉक्टर्स नाहींत ? डॉ. भडकमकर कोण आहेत ? बंडोपंत घारपुरे कोण आहेत ? यांना असं का म्हणायचंय कीं पुण्यांत पहिलवान नाहींत ? शिवा–कुशाची जोडी नजरेसमोर आणा ! काय–पुण्यांत देशभक्त नाहींत ? राजगुरु कोण होऊन गेले ? शंकरराव देव कोण आहेत ? काकासाहेब गाडगीळ कोण आहेत ? पुण्यांतले पूर्वीचे सारे देशभक्त आठवा ! काय–पुण्यांत करमणूक नाहीं ? कोठें, कोठें जायचें आहे तुम्हांला ? नाटकाला ? विजयानंद नाट्यगृह आहे. सिनेमाला ? पंधरा थिएटरें

आहेत. तमाशाला ? इब्राहीम आहे. त्यांना असं का म्हणायचंय कीं पुण्यांत खानावळी नाहींत ? पुण्यांत हॉटेल्स नाहींत ? मुरगी आणि पुलाव्यावर ताव मारायचा असेल तर लकडीपुलापलीकडे जा ! मिसळ अन् भजीं खायचीं असतील तर जा पेरू-गेटा-जवळच्या बॉंबे रेस्टॉरंटमध्यें ! त्यांना असं का म्हणायचंय कीं पुण्यांत नटी नाहींत ? शांता आपटे कोठली—वासंती कोठली—उषा मंत्री कोठली ? बोला, पुण्यांत राम नसायला काय झालं ?—

म्हणे पुण्यांत राम नाहीं. कां—कां ते बोलले असं ? या पुण्यांत राम आहे. या या पुण्यांत किती तरी आनंद भरला आहे. या पुण्यांत किती तरी मजा आहे. पुण्यांतील सृष्टिसौंदर्य कळायला तशी दृष्टि पाहिजे. पुण्यांतील स्त्रीसौंदर्य न्याहाळा-यला तशी रसिकता हवी ! या पुण्यांत काय नाहीं ? एम्प्रेस गार्डन— बंड गार्डन—बोटॅनिकल गार्डन ! नुसती नामावळी ऐकूनच माणूस खूष होईल ! मग त्या बागेंत जाऊन त्यामधील फुलांचा मृदु सौरभ घेत बसल्यास या मृत्युलोकाची विस्मृति पडून आपण शाकुंतलांत वर्णिलेल्या कण्वाच्या आश्रमाशेजारीं विहार करीत आहोंत असं भास होईल ! बंडगार्डनच्या बांधाकडे बघा ! पाण्याचें ओघळ जमिनीवरून चालले आहेत—चपळ असून शांत ! अवखळ असून नादमधुर ! टिकल्यांच्या चंद्रहाराचा सर घसरतो आहे असं वाटतं ! कोण, कोण म्हणतो पुण्यांत राम नाहीं ? पुण्याच्या मंडईत भिन्नभिन्न चवींच्या फळांनीं भरलेले करंडे पाहा ! पपनस ! घ्या त्याची चव ! संत्रीं ! खा एक एक फोड ! आंबे ! ओरपा भरपूर रस ! अंजीर ! अंजीराची गोडी न्यारीच ! द्राक्षं ! कोणाला नाहीं आवडणार ? आणि सिताफळ ! आतां तरी म्हणा पुण्यांत राम आहे म्हणून ! कचेरींतील शारीरिक दुःखाचा विसर पडावा—संसारां-तील मानसिक दुःखांची विस्मृति व्हावी— जा एकाद्या क्लबवर ! पत्ते खेळा—सोंगट्या खेळा—बिलियर्ड खेळा—टेनिस खेळा— ! जेथें मादक पेयांचे चषक झोंकीत लोक विहार करतात तिकडे जा ! आणि हें सर्व पाहून—आणि हें सर्व न्याहाळून—तरी म्हण पुण्यांत राम आहे म्हणून !

" अरेरे ! पुण्यांत राम नाहीं ! " कोण—कोण म्हणेल असं ! पुण्यांत राम आहे—पुण्यांत रहीम आहे ! पुण्यांत हिंदू आहेत— पुण्यांत मुसलमान आहेत ! पुण्यांत कोंकणस्थ आहेत— पुण्यांत देशस्थ आहेत ! पुण्यांत सनातनी आहेत— पुण्यांत नव-मतवादी आहेत ! पुण्यांत शूर्पणखा आहेत— पुण्यांत अप्सरा आहेत ! पुण्यांत विद्वान् आहेत— आणि पुण्यांत मूर्खही आहेत ! पुण्यांत काय नाहीं ? " अरेरे ! पुण्यांत

ब्राह्मण नाहींत ! ” असे उद्‌गार कांहीं वर्षांपूर्वी भर पुण्यांत पुरुषोत्तमपंत लाडांनीं काढले ! विद्वान् म्हणून गप्प बसलांत तुम्ही ! न्यायमूर्तींच्या तोंडचे उद्‌गार म्हणून गय केलीत त्यांची ! पण “ अरेरे ! पुण्यांत राम नाहीं ! ” असं बोललं जात असतांना–असं तुमच्या नाकावर टिच्चून सांगितलं जात असतांना तुम्ही काय करणार ? पुणें हें पुढारलेलें शहर आहे ! रामाशिवाय अयोध्या जशी ओस पडली–तसंच रामाशिवाय हें पुणें ओस पडेल ! पुण्याची महति मी इतकी वर्णून सांगत असतांना–जर कोणी अद्यापि बडबडत असतील कीं पुण्यांत राम नाहीं म्हणून–तर–तर ! त्यांना “ अंधस्य दीपो बधिरस्यगीतं ! मूर्खस्य कीं शास्त्रकथाप्रसंगः ॥ ” हें वचन बहाल करण्यांत तरी काय राम आहे ?

★ ★ ★

१

# जागा भाड्यानें देणें आहेत !

[ पुण्यांत विद्वानांना मुळींच तोटा नाहीं ! पानपट्टीवाल्यांपासून प्रोफेसरापर्यंत प्रत्येक जण स्वतःला सारखाच विद्वान समजतो. अशाच एका विद्वानानें तीन तीन खोल्यांचे चार ब्लॉक्स बांधले व प्रत्येक ब्लॉकच्या दर्शनी भागावर तो ब्लॉक कोणाकरितां भाड्यानें देणें आहे हें लिहिलें. व त्या त्या ब्लॉकमध्यें येणाऱ्या भाडेकरूला काय काय अटी पाळाव्या लागतील त्याचे चार तक्ते केले. ते तक्ते आम्हांस पहावयास मिळाले. आणि घरमालकानें ते तक्ते तयार करतांना काय काय अकलेचे तारे तोडले आहेत ते वाचकांना समजण्यासाठीं आम्ही येथें ते सादर करीत आहोंत. ]

## साहित्यिकाकरितां जागा भाड्यानें देणें आहे !

( १ ) मराठी वाङ्मयाच्या प्रासादांतील एका विशिष्ट दालनांतच आपल्या कलेला राबविणाऱ्या साहित्यिकालाच फक्त जागा भाड्यानें मिळेल !

( १ अ ) मराठी वाङ्मयप्रासादांत हवा तसा हैदोसधुल्ला घालणाऱ्या साहित्यिकाला जागा भाड्यानें मिळणार नाहीं !

१ ब ) साहित्यिक भाडेकरूनें वाङ्मयचौर्य केलें असतां कामा नये—आणि करतां कामा नये !

( २ ) साहित्यिक विनोदी असला तर त्याला जागा भाड्यानें देण्यांत पहिला चान्स दिला जाईल !

( ३ ) साहित्यिक भाडेकरूनें जागेचें भाडें रु. आणे. पै. च्या हिशोबांतच दिलें पाहिजे. भाड्याच्या ऐवजीं ग्रंथ स्वीकारले जाणार नाहींत !

( ४ ) साहित्यिक भाडेकरूनें रात्रीं लिहून विजेचें बिल वाढवितां कामा नये !

( ४ अ ) आपल्या विद्वत्तेचा प्रकाश पाडावयाचा असेल तर तो दिवसां पाडावा !

( ५ ) खोलींतल्या भिंती वेळीं अवेळीं स्फुरलेल्या कल्पनांनीं चितारूं नयेत ! तसें केल्याचें आढळून आल्यास नुकसान भरपाई घेतली जाईल !

( ६ ) साहित्यिक भाडेकरू कुटुंब–वत्सल असला पाहिजे !

( ७ ) शेजारील भाडेकऱ्यांस वाङ्मयीन चर्चेनें त्रास होईल असें वर्तन साहित्यिक भाडेकरूनें करतां कामा नये !

( ८ ) मालकाकडे लग्न–मुंज वगैरे कार्य निघाल्यास साहित्यिक भाडेकरूनें मंगलाष्टकें मोफत करून व छापून दिलीं पाहिजेत !

( ९ ) मालकाचे परवानगीशिवाय साहित्यिक भाडेकरूला पोट भाडेकरी ठेवतां येणार नाहीं.

(१०) साहित्यिक भाडेकरू, भाडेकरू संघाचा सभासद असतां कामा नये !

(११) साहित्यिक भाडेकरूचा कोठें सत्कारसमारंभ झाल्यास त्याप्रसंगीं त्याला मिळणारा हार, गुच्छ, लगोलग मालकाकडे पोंचता झाला पाहिजे !

(१२) साहित्यिक भाडेकरूचें पुस्तक प्रसिद्ध झाल्यास त्याच्या दहा तरी कॉपीज मालकाला भेट म्हणून दिल्या पाहिजेत !

**वि. सू.**:—वरील १२ अटींचा भंग करून त्यांचे बारा वाजविण्याचा साहित्यिक भाडेकरूनें प्रयत्न केल्यास, एकाद्या वेड्यालासुद्धां ती जागा दिली जाईल, पण साहित्यिक भाडेकरूला मात्र काढलें जाईल !

## वकिलाकरितां जागा भाड्यानें देणें आहे !

( १ ) कोठल्याही कोर्टांत कमींत कमी दहा वर्षें तरी प्रॅक्टीस झाली आहे अशा वकिलासच जागा भाड्यानें दिली जाईल !

( २ ) वकील विवाहित असला पाहिजे ?

( ३ ) वकील भाडेकरूनें भाड्याचे पैसे दरमहा आगाऊ रोख दिले पाहिजेत. अशीलाकडून आल्यावर देऊं ही सबब मानली जाणार नाहीं !

( ४ ) मालकांचें अगर मालकाच्या इतर नातेवाईकांचें कोर्टांत कांहीं काम निघाल्यास वकील-फी न घेतां फुकट करून दिलें पाहिजे !

( ५ ) अशीलाकडून वकील-भाडेकरूस कांहीं भेट आल्यास त्यांतील कांहीं भाग तरी मालकाकडे त्वरित पाठविला पाहिजे !

( ६ ) वकील-भाडेकरूनें स्त्री-अशीलांचीं कामें घेण्यास सक्त मनाई आहे !

( ७ ) वकीलानें अशीलाशीं कामाबद्दल चर्चा करतांना इतर भाडेकरूंस त्रास होईल असें वर्तन करतां कामा नये !

( ८ ) मालकाच्या इतर भाडेकरूंसंबंधीं कोर्ट-दरबाराचा प्रश्न उपस्थित झाल्यास वकीलभाडेकरूनें मालकाचेंच वकीलपत्र घेतलें पाहिजे !

**वि. सू:**—वरील आठ अटींपैकीं कोणत्याहि अटीचा भंग केल्यास वकिलाला बिनतक्रार अगर कोर्टांत न जातां जागा सोडावी लागेल !

## डॉक्टरला जागा भाड्यानें देणें आहे !

( १ ) डॉक्टरला जागा भाड्यानें देणें आहे याचा अर्थ पी. एच. डी., डि. लिट., वगैरे प्रकारची पदवी धारण करणाऱ्यांना असा करूं नये !

( १ अ ) डॉक्टरला याचा अर्थ मेडिकल प्रॅक्टीस करणाऱ्याला असा करावा.

( २ ) परदेशांतून डॉक्टरी विषयांतील उच्च पदवी धारण करून येणाऱ्यांना प्रथम जागा दिली जाईल !

( ३ ) डॉक्टर भाडेकरूनें भाड्याचे पैसे रोख दिले पाहिजेत ! औषध घेऊन बिलांत पैसे वसूल करून घ्या, ही सबब ऐकली जाणार नाहीं !

( ४ ) मालकाच्या घरांतील मंडळींना व मालकाकडे येणाऱ्या पाहुण्यांना कांहीं रोगराई झाल्यास डॉक्टर भाडेकरूनें औषध मोफत दिलें पाहिजे !

( ५ ) डॉक्टर भाडेकरूकडे सँपल म्हणून येणारीं टॉनिक्स् मालकाकडे लगोलग पोचती केलीं पाहिजेत !

( ६ ) डॉक्टर भाडेकरू विवाहित असला पाहिजे !

( ७ ) डॉक्टर-भाडेकरूनें रात्रीं बेरात्रीं घरीं येऊन शेजारील भाडेकऱ्यांस त्रास होऊन त्यांची झोंपमोड होईल असें वर्तन करतां कामा नये !

( ८ ) मालकाकडे बाळंतपण वगैरे निघाल्यास डॉक्टर भाडेकरूनें तें मोफत केलें पाहिजे !

( ९ ) वैद्य श्रेष्ठ कीं डॉक्टर श्रेष्ठ असा निरर्थक वाद माजवून डॉक्टर–भाडेकरूनें शेजारील भाडेकरूंना त्रास होईल अशी चर्चा करूं नये !

**वि. सूः**—वरील नऊ अटींपैकीं कोणत्याही अटीचा भंग झाल्यास एकाद्या वैदूला ती जागा दिली जाईल पण डॉक्टर भाडेकरूला मात्र काढलें जाईल !

## प्रोफेसरकरितां जागा भाड्यानें देणें आहे !

( १ ) प्रोफेसरकरितां याचा अर्थ चिवडा तयार करणारे प्रोफेसर, सर्कसवाले प्रोफेसर, वगैरे करूं नये. विश्वविद्यालयांत शिकवणारा असा करावा !

( २ ) प्रोफेसर भाडेकरूनें भाड्याचे पैसे रोख दिले पाहिजेत ! मालकाच्या मुलांच्या शिकवणीच्या पोटीं वसूल करून घ्या ही सबब ऐकली जाणार नाहीं !

( ३ ) प्रोफेसर भाडेकरूनें रात्रीं अपरात्रीं वाचन करून अगर टिपणें काढून विजेचें बिल वाढवितां कामा नये !

( ४ ) प्रोफेसर-भाडेकरूनें मालकांकडील मुलांना फुकट शिकवणी दिली पाहिजे !

( ५ ) मालकांकडील कोणीही अगर मालकांच्या नातेवाईकांपैकीं कोणीही विश्वविद्यालयीन परीक्षेस बसले तर वशिला लावून त्याला पास करण्याचा प्रयत्न प्रोफेसर भाडेकरूनें केला पाहिजे !

( ६ ) प्रोफेसर भाडेकरूला विद्यार्थ्यांकडून लांच म्हणून कांहीं आल्यास त्यांतील निम्मा वांटा तरी मालकाकडे पोंचता केला पाहिजे !

( ७ ) प्रोफेसर भाडेकरूला सुपारीच्या खांडाशिवाय कोठलेंही व्यसन असतां कामा नये !

**वि. सू. :**—वरील अटींपैकीं कोणत्याहि अटीचा भंग केल्यास एखाद्या मास्तरला जागा दिली जाईल, पण प्रोफेसर भाडेकरूला मात्र जागा खालीं करून द्यावी लागेल ! प्रोफेसर भाडेकरूचें लेक्चर ऐकलें जाणार नाहीं.

★ ★ ★

१०

# अरेरे ! अगदीं फुकट गेला !

एका पांढरपेशा गरीब कुटुंबांत त्याचा जन्म झाला ! पंचविसाव्या वर्षी तो कौटुंबिक गोष्टी लिहूं लागला ! चाळिशींत त्यानें पोटासाठीं प्रकाशकाचा धंदा सुरू केला ! आतां तो एका मासिकाचा संपादक झाला आहे !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

वयाच्या सातव्या वर्षी तो सा रे ग म म्हणूं लागला ! तेराव्या वर्षी त्यानें संगीताचा क्लास जॉईन केला ! विसाव्या वर्षी तो खाँसाहेबांचा शिष्य बनला ! आतां तो स्वतःला भावगीत-गायक म्हणवून घेतो !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

१९३० च्या चळवळींत त्यानें कॉंग्रेसमध्यें प्रवेश केला ! १९४२ च्या 'चलेजाव' मध्यें भीतीनें तो भूमिगत झाला ! घरचे राजकारण न मानवल्यामुळें तो पुढें रशियावादी बनला ! आतां तो घातपात करणारा कम्युनिस्ट झाला आहे !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

प्रथम त्याला दारूचें भयंकर व्यसन होतें! दारुबंदीमुळें त्याला नीरा पिण्याची चटक लागली! नीरा परवडेना म्हणून तो पियूष पिऊं लागला! पियूषाचा कंटाळा आल्यामुळें आतां तो कांहींच पीत नाहीं!

—अरेरे! अगदीं फुकट गेला.

★

निमिषार्धात पैसे मिळवण्याची त्याला विलक्षण हांव होती! लहानपणापासून तो रेसेस् खेळत होता! रेसेस्मध्यें पैसे गेल्यामुळें तो आंकडे लावूं लागला! आतां तो वर्तमानपत्रांतील कोडीं सोडवतो!

—अरेरे! अगदीं फुकट गेला.

★

शाळेच्या नाटकांत प्रथम त्यानें हौसेनें भाग घेतला! कॉलेजांत तर तो ड्रामा सेक्रेटरी म्हणून मिरवूं लागला! वकील झाल्यावर ॲमॅच्युअर म्हणून भूमिका करूं लागला! आतां नव्यानें निघणाऱ्या नाटक कंपनींत तो स्त्रीपार्टी होणार आहे!

—अरेरे! अगदीं फुकट गेला.

★

कॉलेजांत प्रवेश करतांना आय. सी. एस. व्हावेसें त्याला वाटत होतें! इंटरलाच तीनदां डच्चू मिळाल्यामुळें त्यानें तो नाद सोडला! भर बाजार पेठेंत त्यानें किराण मालाचें दुकान काढलें! आज तो काळा बाजार न करतां सचोटीनें धंदा करीत आहे!

—अरेरे! अगदीं फुकट गेला.

★

नाटककार म्हणून तो लोकांच्या नजरेसमोर आला! हौस म्हणून त्यानें एक साप्ताहिक काढलें! अनंतरंगी राजकारणी म्हणून तो पुढें मिरवूं लागला! आतां तो जाहिरात-जनार्दन म्हणून काळ कंठित आहे!

—अरेरे! अगदीं फुकट गेला.

★

स्टंट बोलपटांत प्रथम त्यानें हंटरवाल्याची भूमिका केली ! नंतर विनोदी बोलपटांत तो विनोदी नट म्हणून चमकला ! एका ऐतिहासिक बोलपटांत तो संताची भूमिका करणार आहे !

-- अरेरे अगदीं फुकट गेला !

★

पुण्यांतील प्रसिद्ध आचारी म्हणून त्याची वाहवा होत होती ! पुढें त्यानें खास ब्राह्मणांकरितां खाणावळ काढली ! खाणावळ चालेना म्हणून त्यानें हॉटेल थाटलें ! आतां तो एका दैनिकांत ‘ नवीन पदार्थ ’ या सदरांत लिहीत आहे !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

पहिल्या महायुद्धांत मिलिटरींत तो मानाच्या जागेवर होता ! दुसऱ्या महायुद्धांत तो सैनिकीकरणाचा प्रचार करूं लागला ! महायुद्धानंतर एका संस्थानांत तो डी. एस्. पी. होता ! आतां तो ‘ होम ’गार्ड बनला आहे !

--अरेरे ! अगदीं फुकट गेला !

★

सोळाव्या वर्षीं तो करुणरसपूर्ण गोष्टी लिहूं लागला ! पुढें व्यवसाय म्हणून तो वर्तमानपत्राच्या धंद्यांत शिरला ! घाऊक प्रसिद्धीसाठीं तो कॉंग्रेसमन् म्हणून मिरवूं लागला ! आतां तो पत्रकार परिषदेचा अध्यक्ष झाला आहे !

--अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

बालकवि म्हणून तो प्रथम प्रसिद्धीस आला ! राजकवि म्हणून त्याची राजदरबारीं नेमणूक झाली ! महाकवि म्हणून लोक त्याला मान देऊं लागले ! आतां तो लोककवि झाला आहे !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला !

★

गांधींवर टीका केल्यामुळें त्यानें एकदां माफी मागितली ! नेहरूंवर गलिच्छ लिहिल्यामुळें त्यानें दुसऱ्यांदा माफी मागितली ! एकदां माफी मागून भागत नाहीं म्हणून पुनः माफी मागितली ! आतां त्याला माफीचें वेड लागलें आहे !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

दहा हजार श्रोत्यांपुढें भाषण करण्यास तो प्रथम डरत नसे ! अंडीमार होऊं लागल्यामुळें पुढें तो शंभर श्रोत्यांपुढेंच बोलूं लागला ! तेंही मानवेना म्हणून तो फक्त रेडिओवरुन बोलूं लागला ! आतां तो फक्त बायकोपुढेंच बोलतो !

– अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

प्रथम एक उत्तम तैलचित्रकार म्हणून त्याची गणना होत होती. पुढें तो पुस्तकां-करितां तिरंगी चित्रें काढून देऊं लागला ! नंतर त्यानें व्यंगचित्रें काढावयास सुरुवात केली ! आतां तो एका शाळेंत ड्रॉइंग मास्तर आहे !

– अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

पूर्वी तो सरकारी कॉलेजांत प्रोफेसर होता ! तेथून सेवानिवृत्त झाल्यावर तो क्लासेस चालवूं लागला ! क्लासेस बंद करून मग त्यानें खाजगी शिकवणी धरली ! आतां तो ‘ गाइडें ’ काढूं लागला आहे !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

मुंबई असेंब्लीच्या निवडणुकींत तो पराभूत झाला ! म्युनिसिपालिटीच्या निवड-णुकींत तो सपशेल पडला ! एका बँकेच्या निवडणुकींत त्याचा पराभव झाला ! साहित्यपरिषदेच्या निवडणुकींत तो यशस्वी झाला आहे !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

तोंडाला तोंड देण्यांत तो कोणालाही हार जाणार नाहीं ! वाऱ्याशीं सुद्धां भांडायची त्याची तयारी आहे ! भांडकुदळ म्हणून त्याला सगळें जग ओळखतें ! बायकोपुढें मात्र तो अगदीं गोगलगांय आहे !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

एक नंबरचा थापाड्या म्हणून त्याला सारें जग ओळखतें ! आपल्याला बंगाली भाषा चांगली समजते म्हणून तो थापा मारतो ! त्याच्या थापांना आतां कोणीही फसत नाहीं ! तेव्हां सध्यां तो मित्रांच्या पाठीवर थाप मारून हौस भागवतो !

—अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

शाळेंत ‘ सेंचरी बॅटस्‌मन् ’ म्हणून मुलें त्याला ओळखीत ! कॉलेजांत तो ‘ फास्ट बोलर ’ म्हणून गणला जाई ! जिमखान्यांत उत्तम ‘ फिल्डर ’ म्हणून तो चमकत असे ! आज सारे क्रिकेट शोकीन त्याला अंपायर म्हणून ओळखतात !

–अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★

लहानपणापासून व्यायाम करण्याचा त्याला नाद होता ! तरुणपणांत त्यानें शरीर भरदार कमावलें ! पुढें तो मोठमोठ्या कुस्त्या मारूं लागला ! आज तो फक्त वाक्ययुद्ध खेळत असतो !

–अरेरे ! अगदीं फुकट गेला.

★ ★ ★

११

# डिटेक्टिव्ह रावसाहेब एकबोटे !

श्रावणांतील पहिली मंगळागौर होती ती ! तासगांवच्या रावबहादूर आबासाहेब कानिटकरांच्या बंगल्यांत त्यांच्या एकुलत्या एका आवडत्या मुलीची म्हणजेच तीन महिन्यांपूर्वी लग्न झालेल्या रत्नमालेची लग्नानंतरची पहिलीच मंगळागौर मोठ्या थाटा-माटांत साजरी केली जात होती. रावबहादुरांच्या सौभाग्यवतींनीं ऊर्फ उमाकाकूंनीं पतिराजांपाशीं आज बरेच दिवस पहिल्या मंगळागौरीस जावई बापूंनाही बोलवा असा तीनतीनदां मान वेळावून हट्ट धरल्यामुळें रावबहादुरांनीं मुद्दाम जावईबापूंना बोलावलें होतें. आणि जावईबापूही श्वशुरांच्या विनंतीस मान देऊन म्हणा किंवा हृदयेश्वरीचा विरह फार दिवस सहन करणें शक्य नसल्यामुळें म्हणा सासुरवाडीस आले होते. मंगळागौरीच्या दिवशीं सकाळीं जोडप्यांनीं पूजा केली होती. आणि जावईबापूंचा सबंध दिवस फार मजेंत गेला होता.

आतां रात्रींचा एक वाजण्याचा सुमार होता. बाहेर श्रीयुत ज. स. करंदीकरांच्या अगदीं भविष्याबरहुकूम पाऊस पडत होता. रावबहादुरांच्या बंगल्याबाहेर यावेळीं कोणी चिटपाखरूंही फिरत नव्हतें. घरांतील सर्वांचे फराळ आटोपल्यावर माडीवरील दिवाणखान्यांत रावबहादुर आबासाहेब स्वतः, त्यांचे जामात महादेवराव, त्यांचेकडे असलेला त्यांच्या स्वैंपाकीणबाईचा भाऊ वासुदेव आणि रावबहादुरांचे जिवश्च-कंठश्च स्नेही रावसाहेब एकबोटे, एवढेजण ब्रिज खेळत बसले होते.

खालच्या मजल्यावरच्या दुजोडींत मंगळागौरीस जागवावयास आलेल्या बायका मुली होत्या. प्रथम सर्वजणी फुगड्या खेळल्या. नंतर झिम्मा खेळल्या आणि सर्वजणी

जेव्हां शेवटीं अगदीं दमल्या तेव्हां उखाणा घेण्याचा कार्यक्रम सुरू झाला. चार–पांच जणींनीं उखाणे घेतल्यावर रत्नमालेवर उखाणा घेण्याची पाळी आली. तिनं उखाणा घेतला—

संध्येच्या आचमनांत तिसरं ज्यांचं आचमन, महादेवरावांचं नांव घेतांच तृष्णा होते शमन !

रत्नमालेनं हा उखाणा संपवून अवंढा गिळला असेल नसेल तोंच, सबंध बंगल्यांतील विजेचे दिवे अकस्मात गेले. जिकडे तिकडे ब्लॅक–औट झाला ! मंगळागौरीकरितां जमलेल्या मोठ्या बायका, लहान मुली इतकंच नव्हे तर घरांतील बायकाही ओरडूं लागल्या ! ' दिवे गेले ! ' वरच्या मजल्यावरील पुरुष मंडळीही खाली धडपडत धांवत आली.

' दिवे गेलेत ! अरे काय झालंय बघा कुणी तरी ! नाहीं तर आपल्या घरांतील रॉकेलची बत्ती पेटवा ! ' रावबहादुर ओरडले–

इतक्यांत 'धांवा धांवा–धरा. माझा चपलाहार कोणीतरी हिसकावून घेत आहे!" त्या गडद अंधकारांत रत्नमालेचा आवाज ऐकूं आला.

' अरे कोणीतरी निदान काडी तरी पेटवा ! ए वासुदेव, एकदां दिवा तरी लाव बाबा ! ' रावबहादुर पुनः गरजले–

' थांबावं जरा ! गेलेंच आहे मी स्वैपाकघरांत. आतां लावतें हं निरांजन ! ' उमाकाकूंनीं खुलासा केला–

आणि थोडयाच वेळांत उमाकाकूंनीं निरांजन लावून आणलं ! आणि बंगल्यांत लख्ख उजेड पडला नाहीं तरीं एकमेकांना एकमेकांचे चेहरे ओळखूं येऊं लागले ! आणि त्या उजेडांत तेथल्या सगळया मंडळींना दिसलं कीं रत्नमाला खालीं वांकून कांहीं तरी शोधते आहे.

' रत्ने काय झालं सांग बाळ ? का ओरडत होतीस ? आणि काय शोधते आहेस ? रावबहादुरांनीं विचारलं–!

' बाबा, माझा चपलाहार कोणीतरी हिसकून नेला हो ! अंधार झाल्याबरोबर कोणीतरी माझ्या गळयाभोंवतीं हात टाकले आणि माझा चपलाहार हिसकावून घेऊं लागलें म्हणून मी मघाशीं ओरडलें देखील ! मला वाटलं कीं मी ओरडलें म्हणजे

चपलाहार नेणारा माणूस चपलाहार तेथेंच टाकून पळ काढील! म्हणून हा दिवा लावल्या बरोबर मी शोधायला लागलें,—रत्नमालेनं सा ऽ वकाश एकंदर हकिकतीचा थोडक्यांत आढावा घेतला.

' रावसाहेब तुम्हांला काय वाटतं हा प्रकार पाहून ? हें कांहीं सहजासहजीं झालेलें काम नव्हे! दिवे जाणं—आणि त्याच वेळीं अंधारामुळें झालेल्या गोंधळांत चपलाहाराची चोरी होणं हीं योजनाबद्ध कामं दिसतात मला!' रावबहादुरांनीं रावसाहेबांकडं पहात म्हटलं—

' मी आजपर्यंत वाचलेल्या डिटेक्टिव्ह कादंबऱ्यांवरून, मलाहि तुमच्यासारखंच वाटतं. आज तुमच्याकडे मंगळागौर आहे हें ओळखून त्या वेळीं दिवे गेल्यावर—म्हणजे मुद्दाम घालवल्यावर, एकदम जी गडबड उडेल त्यावेळीं चपलाहार पळवायचा असा बेत अगोदरच रचला गेला असेल असं माझंही स्पष्ट मत आहे!'

रावबहादुरांनीं रावसाहेबांच्या म्हणण्याला होकारार्थी मान हालवून पुनः विचारलं—

' आणि महादेवराव. ए वासु, तुम्हाला काय वाटतं ? बाहेरचा चोर येऊन त्यानें चोरी केली कीं......'

' चोर घरांतलाच असून घरांतच आहे असं ना ?'—रावसाहेबांनीं रावबहादुरांचें वाक्य पुरें केलें!

' शंका येतेय खरी मनांत! वासु, जा—! दारें खिडक्या रात्रीं लावलीं होतीं तशींच आहेत ना बघ पाहू!'

' हो पाहून येतों!' असं म्हणून वासुदेव रावबहादुरांनीं नेमून दिलेल्या कामगिरीवर गेला!

' आणि दारं—खिडक्या लावल्या होत्या तशाच असतील तर मला वाटतं कीं चोर अजून घरांतच लपून बसलेला असेल किंवा घरांतलाच चोर असेल ?' रावसाहेबांनीं पुनः आपली शंका बोलून दाखविली.

थोड्याच वेळांत वासूनं दारं खिडक्या सबकुछ ठाकठीक आहेत असं येऊन सांगितलं.

' मग काय रावसाहेब तुमचं काय म्हणणं ? घरांत शोध करून पोलिसांत वर्दी द्यायची कीं आधींच पोलिसला बोलावून आणायचं ?'

' आबासाहेब थांबा जरा ! आपण आधीं बंगल्यांतला कानाकोपरा शोधून पाहूं आणि मग पाहिजे तर पोलिसला खबर देऊं ! '—महादेवरावांनीं सूचना केली.

आणि मग सर्वजण बंगला पालथा घालून आले. पण मंगळागौरीस बोलावलेल्या बायका-मुलींखेरीज त्यांना दुसरें कोणीही आढळून आलें नाहीं !

' मग काय आतां रावसाहेब-तुम्ही डिटेक्टिव्ह कादंबऱ्या वाचतां—कांहीं लागेल का शोध तुम्हांला—का देऊं वर्दी पोलिसांत. ? '

' आबासाहेब थांबा जरा—इतकी कांहीं गर्दी नको ! रावसाहेबांचं काय म्हणणं आहे पाहूं—आणि मग बघूं वर्दीचं ! '—महादेवरावांनीं पुनः एकदां सूचना केली.

' आबासाहेब ! तुम्ही आतां सर्वजण वर जा ! मी या दुजोडीची बारकाईनं तपासणी करणार आहे. आणि मग मीं कांहीं जणांना प्रश्न विचारणार आहे. तसं प्रत्येकाला सांगून ठेवा. नाहीं तर मग कोणी रागवायला नको ! '—असें सांगून राव-साहेब आपल्या कार्यास लागले. बाकीचे सर्वजण वर गेले. बायका व मुली आधींच पुरुष आलेले पाहून शेजारच्या खोलींत गेल्या होत्या.

रावसाहेबांनीं प्रथम रत्नमाला त्यांना अंधारानंतर झालेल्या उजेडांत जेथें प्रथम दिसली त्याजवळची जागा तपासायला सुरवात केली ! प्रथम त्यांना चोर पुराव्यावरून शोधून काढतां येईल असें कांहींच सांपडेना, म्हणून त्यांनीं पुनः बारकाईनें तपासणीस सुरवात केली. शेरलॉक होम्स किंवा सेक्स्टन ब्लेक ज्या तऱ्हेनें आपल्या तपासास सुरुवात करीत तशी त्यांनींही सुरुवात केली, तेव्हां त्यांना एका बाजूला एक तपकिरीची डबी पडलेली दिसली ! रावसाहेबांनीं प्रथम ती डबी खिशांत घातली ! मग पुनः इकडेतिकडे ते आणखी कांहीं सुगावा लागतो कीं काय तें पाहूं लागले. पण त्यांना कांहींच मागमूस लागेना. अखेर कंटाळून ते तेथेंच असलेल्या एका स्टुलावर विचार करीत बसले. आणि त्यांच्या डोक्यांत काय प्रकाश पडला कोणास ठाऊक एकदम टाळी वाजवून ते जवळ जवळ धांवतच वरच्या माडींत गेले व रावबहादुरांना म्हणाले—

' मला रत्नमालेला कांहीं प्रश्न विचारायचे आहेत. बोलवा पाहूं तिला वर ! '

रावबहादुरांनीं रत्नमालेला वर बोलावून घेतलें. आणि मग रावसाहेबांनीं तपासणीस सुरुवात केली.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
वा. क्र. ..........

'रत्ना ! तुला अंधार झाल्याबरोबर काय झालं हें सांगतां येईल का नीट-सांग पाहूं !'

'मघाशीं मी आबासाहेबांना जें सांगितलं त्यापेक्षां मला जास्त कांहींच सांगतां येणार नाहीं !' रत्नमालेनें आपली बाजू मांडली.

'पण एक सांग कीं तुझा चपलाहार तुझ्या गळ्यांतून हिसकून घेणारी व्यक्ति बाई होती कीं पुरुष ?'

'बाईसारखा हात तरी मऊ वाटला ! पण मला नक्की कांहींच सांगतां यायचं नाहीं ?'

'तूं त्या व्यक्तीला धरून ठेवण्याचा प्रयत्न केलास का ?'

'हो ! पण अंधारामुळें त्या व्यक्तीनें चटदिशी पलायन केलेलें दिसतें !'

'बरं जा आतां तूं !'-असें म्हणत रावसाहेब रावबहादुरांकडे वळत पुनः म्हणाले-

'आबासाहेब तुमच्याकडे तपकीर कोण ओढतं सांगतां का ?'

'मला कांहीं वाटत नाहीं दुसरं कोणी ओढीत असेलसं ! पण वासुदेवाची आई मात्र ओढते !'

'मला वाटलंच होतं—!' रावसाहेबांनीं असं बोलायला आणि सर्वांनीं वासुदेवा-कडे पाह्यला जवळजवळ एकच गांठ पडली ! वासुदेवाचा चेहेरा खरकन् उतरला !

'मग त्यांना वर बोलवा पाहूं !'—रावसाहेबांनीं आबासाहेबांना सांगितलें.

वासुदेवची आई वर आली ती जराशी घाबरतच !

रावसाहेबांनीं दुसरी तपासणी सुरू केली.

'काहो तुम्ही आबासाहेबांकडे किती दिवस काम करीत आहां !'

'आज जवळजवळ दहा वर्षें तरी झालीं असतील.'

'म्हणजे रत्नमालेचे लग्नांत तुम्ही होतां तर ?'

'हो !'

'तिच्या अंगावर काय दागिने घातले तें तुम्हांला माहीत असेलच ?'

'हो.'

'त्या दागिन्यांत चपलाहार होता का ?'

'हो'!

'बरं आज ज्यावेळीं अंधार झाला त्यावेळीं तुम्ही कोठें होतां—?'

‘ बाहेरच्या झोपाळ्यावर जरा पडलं होतं ! ’

रावसाहेबांनीं आबासाहेबांकडे पाहून विचारलें–

‘ आबासाहेब त्या झोपाळ्याच्या खोलींतच दिव्यांचें मेन कनेक्शन आहे ना ? ’

‘ हो ! ’ आबासाहेबांनीं उत्तर दिलें. रावसाहेबांनीं पटकन् वासुदेवच्या आईला विचारलें--

‘ मग दिवे गेले त्यावेळीं तेथें तुमच्याशिवाय कोणी होतं का ? ’

‘ कोणी नाहीं ! ’

‘ बरं आतां ही डबी पहा ! ओळखतां कां तुम्ही ? ’ रावसाहेबांनीं डबी दाखवीत विचारलें आणि सहज वासुदेवकडे पाहिले. त्याचा चेहेरा पार उतरून गेला होता !

‘ हो माझीच डबी आहे ती ! अगबाई तुमच्याजवळ कशी आली ? ’

‘ मला रत्नमालेची जेथें चोरी झाली त्या जागेंत सांपडली. डबी तेथें कशी गेली याचा खुलासा करतां येईल का तुम्हांला ? ’

‘ नाहीं सांगतां यायचं मला ! ’

वासुदेवच्या आईनं असं सांगतांच ताडकन् रावसाहेब उठून उभे राहिले–आणि वासुदेवच्या आईकडे बोट दाखवीत म्हणाले !—

‘ मग तर माझी खात्रीच आहे आबासाहेब–तुमच्या रत्नाचा चपलाहार यांनींच चोरला ! ’

‘ काय ! यांनीं चोरला ! ज्यांचा मुलगा—मला मुलगा नसल्यामुळें मी पोटच्या मुलासारखा सांभाळला, त्याची परतफेड यांनी अशी करावी ना ! ’ रावबहादूर गरजले ! इतक्यांत रत्नमाला माडीवर खालून धांवत धांवत आली आणि रावबहादुरांजवळ जाऊन म्हणाली—

‘ बाबा ! त्यांच्यावर रागाऊं नका ! रागवायचं असेल तर माझ्यावर आणि तुमच्या जांवईबापूंवर रागवा ! हा पाहा माझा चपलाहार ! आहे तेथेंच आहे ! ’

‘ म्हणजे मग दिवे जाणं—तुझं ओरडणं—चपलाहार चोरला जाणं—हें सगळं खोटंच वाटतं ! आणि या तुमच्या नाटकांत जांवईबापूही सामील आहेत वाटतं ! पण कशाकरितां हें नाटक केलंत ! ’

‘ सामील कोण नाहीं बाबा या नाटकांत ! तुमच्याशिवाय सर्वजण–हो आतां या बंगल्यांत असणारी सर्वजणं या नाटकांत सामील आहेत. आतांपर्यंत मंगळागौरीस

होणारे तेच तेच खेळ पाहून मला कंटाळा आला होता. कांहींतरी नवा खेळ शोधून काढावा असं माझ्या मनांत होतं. आणि हा अशातऱ्हेचा खेळ करून पाहावा असं मी आणि यांनीं ठरवलं. सर्वांना त्यांत सामील करून घेतलं. आतां तुम्हींच सांगा ! आजकाल होणाऱ्या रंगभूमीवरील नाटकांपेक्षां आमचं हें नाटक जास्त प्रभावी ठरेल कीं नाहीं तें ! या नाटकांत वीररस आहे–करुणरस आहे–हास्यरस आहे ! अगदीं आधुनिक तंत्रानं आणि मंत्रानं बद्ध असं हें नाटक आहे ! '

' वारे ! अगदीं नामी युक्ति योजलीत माझी करमणूक करण्याची ! '–रावबहादुरांनीं असं बोलायला आणि बंगल्यांत पुनः विजेच्या दिव्यांचा प्रकाश पडायला एकच गांठ पडली !

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ............
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0007387